# ४०
# वर्षांपूर्वीच्या आणीबाणीचे स्मरण

साप्ताहिक
संस्थापक साने गुरुजी

# साधना

Weekly Sadhana
शनिवार, ४ जुलै २०१५ | मूल्य रु.१०







Video
Social media
SCRATCH
Database
Connect & Share
Document Mgt.
Internet Utility
Computer Setting
Presentation
email
MKCL
आपली मुलं खरंच
'कंप्यूटर मास्टर्स' आहेत का?
मुलं कंप्यूटर हाताळू लागली, एकमेकांमध्ये त्याबद्दल बोलू लागली तेव्हा मलाही हाच प्रश्न पडला होता. पण MS-CIT कोर्समध्ये प्रासंगिक चॅलेंजेस आणि प्रॅक्टिकल्स स्वतः पाहिल्यावर मला मात्र खरं समजलं की गेमिंग, चॅटिंग हा तर कंप्यूटरचा वरवरचा उपयोग. मुलांना रोजच्या जीवनात आणि करियरमध्ये कंप्यूटरचा स्मार्ट उपयोग करता यायलाच हवा! प्रॅक्टिकल्समधून आत्मविश्वास मिळायलाच हवा! तो मिळतो MS-CIT मधून.
या सुट्टीत माझी मुलं MS-CIT करणार आहेत. आपण काय ठरवलंय?
MS-CIT अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये
MS-CIT
९५ लक्ष विद्यार्थ्यांनी अनुभवलेला, एक परिपूर्ण कंप्यूटर कोर्स!
आजच प्रवेश घ्या! | संपर्क: 93265 52525
नवीन
MS-CIT

# अनुक्रम


४
**आणीबाणीचा धडा**

७
**आणीबाणी अपरिहार्य होती काय?**
**जे.पी. : राष्ट्राची सद्सदविवेकबुद्धी**
एच. वाय. शारदाप्रसाद

१२
**इंदिरा गांधींना अनावृत पत्र**
जयप्रकाश नारायण

१९
**दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धातील 'साधना'चा लढा**
सदानंद वर्दे

२६
**नरो वा कुंजरो वा :**
**आणीबाणीतील न्यायपालिका**
प्रतापसिंह साळुंके



४ जुलै २०१५
वर्ष ६७ / अंक ४८

संपादक :
विनोद शिरसाठ

**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**

अंकनिर्मिती व्यवस्थापक व अक्षररचना :
**सुरेश माने**

मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा. लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून,
**४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.**
येथे प्रसिद्ध केले.
संपादक- विनोद शिरसाठ.

Ph. : (020) 24451724
Mob. : 7028257757
weeklysadhana@gmail.com
web. weeklysadhana. com

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. अंकातील छायाचित्रे इंटरनेटवरून.)

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ६०० रुपये**
**दोन वर्षासाठी : १२०० रुपये**
**तीन वर्षासाठी : १८०० रुपये**

नाव, पत्ता, फोन नं व इ-मेल इत्यादी तपशील कळवून रोख/म. ऑ. /डी. डी. /चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, रक्कम साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, खाते क्र. 60025586634, IFSC MAHB - 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल/फोन करून कळवावेत.

## संपादकीय

# आणीबाणीचा धडा

समकालीन भारतीय राजकारणाचे अभ्यासक सुहास पळशीकर यांच्या मते, गेल्या ६५ वर्षांत भारताची लोकशाही दोन वेळा रुळावरून घसरली. पहिल्यांदा आणीबाणी लागू झाली तेव्हा आणि नंतर बाबरी मशीद पाडली गेली तेव्हा. म्हणजे काँग्रेस व भाजप या दोनही पक्षांनी देशाच्या लोकशाही-वाटचालीवर एकेक काळा डाग निर्माण केलेला आहे. दि. २५ जून १९७५ च्या मध्यरात्री भारतात राष्ट्रीय आणीबाणी लागू केल्याची घोषणा राष्ट्रपतींनी केली, त्या घटनेला आता बरोबर ४० वर्षे झाली आहेत. आणीबाणी १९ महिने टिकून राहिली आणि त्या काळात देशाचे संपूर्ण समाजजीवन ढवळून निघाले. भारताचे प्रजासत्ताक रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करीत असताना ती आणीबाणी लागू झाल्याने, भारताच्या लोकशाही व्यवस्थेवर काळाकुट्ट डाग पडला.

आता आणीबाणीचे ४० वे स्मृतिवर्ष साजरे करीत असताना, केंद्रीय सत्तेवर नरेंद्र मोदी हे पंतप्रधान असल्याने अनेकांच्या मनात शंका-कुशंका निर्माण होत आहेत. लालकृष्ण अडवाणी यांनी तर 'आणीबाणी लागू होण्याचा धोका संपलेला नाही' असे म्हटले आहे. आणि सर्वांच्या नजरेतून सुटलेली गोष्ट ही आहे की, २१ जूनला सोनिया गांधी एक आठवड्यासाठी परदेशी रवाना झाल्याची छोटी बातमी आली असून, राहुलही त्यांच्याबरोबर जाण्याची शक्यता आहे, असे त्या बातमीत म्हटले आहे. याचा अर्थ, आणीबाणीचे ४० वे वर्ष देशभर साजरे केले जात असताना, काँग्रेसचे अध्यक्ष व उपाध्यक्ष भारतात जाणीवपूर्वक थांबणार नाहीत. हा अंक २३ जूनला छापायला जात असल्याने, काँग्रेसकडून आणीबाणीविषयी अधिकृतपणे काय प्रतिक्रिया येणार आहे, हे समजलेले नाही. पण आणीबाणीचे समर्थन काँग्रेसने जाहीरपणे करण्याचे सतत टाळले आहे. आणखी अडीच वर्षांनी म्हणजे ६ डिसेंबर २०१७ रोजी, अशीच अडचण भाजपची होणार आहे; कारण त्या वेळी बाबरी मशीद विध्वंसाचा रौप्यमहोत्सव साजरा होईल. (त्या घटनेच्या वेळी अडवाणींच्या रथाचे सारथ्य करणाऱ्यांमध्ये नरेंद्र मोदी हे एक होते.)

आणीबाणीच्या काळात व्यक्तीच्या व माध्यमांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच हा मुद्दा सर्वाधिक महत्त्वाचा ठरला. त्या वेळी साधना साप्ताहिकाची कामगिरी मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात सर्वोत्तम राहिली आहे. आणि साधनाचा सर्वाधिक झळाळता कालखंड आणीबाणी-पर्वातलाच आहे. त्यामुळे साहजिकच, साधनाचा एक संपूर्ण अंक आणीबाणीची आठवण जागवणारा काढणे आवश्यक वाटले. पण गेल्या ४० वर्षांत आणीबाणीविषयी सर्वत्र व साधनातही इतके काही लिहून आले आहे; बोलले गेले आहे की, नव्याने व नवीन असे काय व किती सांगणार? म्हणून या अंकात वैशिष्ट्यपूर्ण चारच लेख घेतले आहेत. आणीबाणी लागू झाल्यानंतर जयप्रकाश नारायण यांनी तुरुंगातून पंतप्रधान इंदिरा गांधींना जे पत्र लिहिले होते, त्याचा संपूर्ण अनुवाद त्या वेळीच साधनात प्रसिद्ध झाला होता; ते पत्र या अंकात पुनर्मुद्रित केले आहे. आणीबाणीचे समर्थन करणारांचे व जयप्रकाशांच्या संदर्भात आक्षेप घेणारांचे सर्व मुद्दे या पत्रात खोडून काढलेले आहेत. दुसरा पुनर्मुद्रित केलेला लेख आहे; साधनाच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका राहिलेल्या सदानंद वर्दे यांचा, तो लेख साधनाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात अंकात प्रसिद्ध झाला होता. या लेखातून त्यांनी आणीबाणीच्या काळातील साधनाचे मूर्तिमंत रूप उभे केले आहे. आम्हाला खात्री आहे, हे दोन्ही लेख वाचताना बहुतांश वाचकांच्या अंगावर रोमांच येतील.

इंदिरा गांधींचे माध्यम सल्लागार राहिलेले व अत्यंत आतल्या गोटातील समजले जाणारे एच.वाय.शारदाप्रसाद यांच्या The Book I Won't Be Writing या पुस्तकातील दोन छोटे लेख, अनुवाद करून प्रसिद्ध करणे आवश्यक वाटले. कारण या लेखांमधून एक इनसायडर माणूस, आऊटसायडर झाल्यानंतर वीस-पंचवीस वर्षांनी (आयुष्याच्या अखेरीस) आणीबाणीकडे व जयप्रकाशांकडे कसे पाहतो, ते अतिशय नेमकेपणाने व मार्मिक पद्धतीने आले आहे. वैचारिक तटस्थपणाचे उत्तम नमुने म्हणून हे दोन लेख दाखवता येतील. (खरे तर ते संपूर्ण पुस्तक अशाच प्रकारच्या लेखांनी भरलेले आहे.) शेवटचा लेख प्रा.प्रतापसिंह साळुंके यांचा आहे आणि फारशा चर्चिल्या न जाणाऱ्या व सर्वसामान्यांपासून बऱ्याच अपरिचित असलेल्या न्यायव्यवस्थेकडे एक चिकित्सक दृष्टिक्षेप यात टाकलेला आहे.

मागील ४० वर्षांत, आणीबाणीचे समर्थक व विरोधक यांच्या भूमिका बदलल्यात अशी उदाहरणे फार कमी आहेत. म्हणजे त्यावेळी ज्यांनी आणीबाणीच्या समर्थनाची भूमिका घेतली, त्यांनी नंतर ते समर्थन चूक होते असे म्हटल्याचे फारसे ऐकिवात नाही. आणि उलटही खरे आहे. त्यावेळी ज्यांनी आणीबाणीला विरोध केला, त्यापैकी कचितच काही लोकांनी नंतर आणीबाणी योग्य किंवा अपरिहार्य होती असे म्हटले आहे. या संदर्भात, साधनाच्या सर्व संपादकांना व धोरणात्मक निर्णय घेणारांना आणीबाणी ही एक 'ब्लंडर मिस्टेक' होती, असेच वाटत आले आहे. त्या कालखंडाचे व निर्माण झालेल्या परिस्थितीचे अनेक वेळा पुनरावलोकन केल्यानंतरही आमचे तेच मत कायम आहे. त्यामुळे पुन्हा तशी परिस्थिती आली तर साधनाची भूमिका काय राहील? अर्थातच, आपले अस्तित्व पणाला लावून साधना आणीबाणीविरोधात लढत राहील!

त्यामुळे आता प्रश्न एवढाच उरतो की, त्यावेळी आणीबाणी लागू करण्याचा निर्णय का झाला, आणि त्याची जबाबदारी कोणकोणत्या घटकांकडे जाते. अर्थातच, इंदिरा गांधी व त्यांच्या सभोवतालचे कोंडाळे हे त्याबाबत सर्वाधिक दोषी आहे. नंतर जबाबदारी येते ती काँग्रेस पक्षाची, आणि त्यानंतर न्यायसंस्था व माध्यमे यांची. पण सारांश निघतोय तो एवढाच की, त्यावेळी देशातील घटनात्मक संरचनाच खूप कमजोर झालेली होती. आणि सर्व प्रमुख संस्थांचा पाया खिळखिळा झालेला होता. त्याची पाळेमुळे अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये अडकलेली होती. म्हणजे १९७१ चे बांगला देश युद्ध, १९७२ चा दुष्काळ आणि भारताच्या शेजारी देशांमध्ये विशेषत: पाकिस्तान व बांगलादेश यांच्या सर्वोच्च नेत्यांना फाशी किंवा हत्याकांड, यामुळे भारतभरात अस्वस्थता होती. इंदिरा गांधींना असुरक्षित वाटण्यामागेही शेजारी देशांमधील परिस्थितींचा काहीअंशी वाटा होताच. अमेरिका व रशिया या दोन महासत्तांमधील सुप्त संघर्षाची किनारही त्या स्फोटक परिस्थितीला होतीच!

मागील चार-पाच वर्षांत, म्हणजे २०११ च्या अण्णा हजारेप्रणित दिल्लीतील जनलोकपाल आंदोलनापासून भारताची परिस्थिती अनेकांना आणीबाणीपूर्व कालखंडासारखी, म्हणजे सत्तरच्या दशकाच्या पूर्वार्धासारखीच वाटत आली आहे. २००९ मध्ये केंद्रात जे सत्तांतर झाले व त्यात काँग्रेसचा जो मानहानीकारक पराभव झाला, त्याचे काहीअंशी साम्य १९७७ च्या निवडणुकीशी दाखवणारेही लोक आहेत. आणि इंदिरा गांधी व नरेंद्र मोदी यांच्यात 'एकाधिकारशाही' प्रवृत्ती व अन्य काही गुण-अवगुण दाखवून तुलना करणारे अभ्यास-विश्लेषकही आहेत. त्यात आता अडवाणींच्या विधानामुळे 'धोका संपलेला नाही' हा इशारा पोहोचलेला आहे.

या पार्श्वभूमीवर आणीबाणीचे स्मरण करताना, या देशातील संस्थात्मक व घटनात्मक संरचना याबाबत अधिक जागरूक व कृतिशील राहण्याची गरज आहे. आणीबाणीसारखे टोकाचे निर्णय घेतले जातात आणि संपूर्ण देशात राबवले जातात, तेव्हा ते सहजासहजी व अचानक घडून येत नाहीत हा संदेश सर्वत्र पोहोचविणे गरजेचे आहे. विशेषत: नव्या पिढीपर्यंत त्याची जाणीव-जागृती झाली पाहिजे. या देशातील १८ ते ३५ या वयोगटातील लोकसंख्या अर्ध्या अब्जाहून अधिक आहे, हा मुद्दा लक्षात घेतला तर त्याची आवश्यकता नेमकेपणाने पटू शकेल. कारण ही सर्व तरुणाई आणीबाणीनंतर जन्माला आलेली आहे, बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचीही कल्पना या तरुणाईला नाही. स्वाभाविकच, काँग्रेस व भाजप या दोनही मोठ्या व प्रमुख पक्षांचा खरा परिचय या नव्या पिढीला नाही. त्यापेक्षाही खेदजनक हे आहे की, या तरुणाईसमोर तिसरा पर्याय (अरविंद केजरीवालचा अपवाद वगळता) नव्याने दिसलेला नाही.

सारांश, आजच्या सर्व पुरोगामी व्यक्ती-संस्था-संघटना-पक्ष यांच्यापुढचे सर्वांत मोठे आव्हान या तरुणाईशी संवाद साधण्याचे आणि त्यांच्या ॲस्पिरेशन्स (आशा-अपेक्षा-आकांक्षा) समजून घेण्याचे आहे. आणि दुसरे मोठे आव्हान आहे, अर्थकारण व आंतरराष्ट्रीय राजकारण याबाबत अधिक साक्षर होऊन- झालेल्या, होत असलेल्या व येऊ घातलेल्या बदलांचे आकलन करून घेण्याचे! ही दोन्ही आव्हाने परस्परपूरक आहेत, त्यामुळे त्या आव्हानांना एकाच वेळी भिडावे लागणार आहे. म्हणजे पुरोगामी शक्तींचे खरे यश त्यांना सत्ताधारी होता येते की नाही आणि राजकीय ताकद किती वाढते यात नसून, या देशाची लोकशाही व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी किती परिणामकारकपणे काम करता येते यात दडलेले आहे.

सफलता-विफलता याबाबतची जयप्रकाश नारायण यांची भूमिका आणि एच.वाय.शारदाप्रसाद यांनी यश-अपयशाची केलेली मांडणी समजून घेतली तरी, पुरोगामी शक्तींना 'आपले यश' नेमके कशात आहे, हे लक्षात येईल.

दुसरी आवृत्ती आली...
(मुखपृष्ठ बदलले आहे)




पाने २३२ । किंमत रु. २५०

# राजकारणाचा ताळेबंद

भारतीय लोकशाहीची वाटचाल

## सुहास पळशीकर

प्रस्तुत लेखसंग्रहामध्ये स्वतंत्र भारतातील राजकारणाचा आढावा घेतला आहे. ते करत असताना तीन राजकीय क्षेत्रांचा विचार केला आहे : संस्थात्मक राजकारण, पक्षीय स्पर्धा आणि पक्षांच्या पलीकडचं सामूहिक चळवळींचं राजकारण.
पण या आढाव्यामागील भूमिका अशी आहे की, आपलं समकालीन राजकारण हे काही अचानक किंवा उपटसुंभ पद्धतीने निर्माण झालेलं नाही; तर स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय अनुभव आणि विविध समूहांमधील स्पर्धा यांचा आधार नंतरच्या राजकारणाला आहे. दुसरं असं की, राजकारण म्हणजे फक्त श्रेष्ठजनांचं कारस्थान नाही किंवा फक्त परिवर्तनाच्या प्रेरणेने चाललेली कृती, असंही त्याचं स्वरूप नाही. म्हणूनच भारताची लोकशाही फसली किंवा तिने जगापुढे काही भव्य आदर्श उभा केला, यापैकी कोणतीच भूमिका राजकारणाकडे बघताना घेऊन चालणार नाही.

दुसरी आवृत्ती आली...




# सेंटर पेज

## सुरेश द्वादशीवार

सोशिओ-पोलिटिकल कॉमेंट्री

'सेंटर पेज' हे मध्यम मार्गाच्या जवळचे 'उग्र पेज' राहिले आहे. त्यात काँग्रेस, भाजप, कम्युनिस्ट, समाजवादी, राष्ट्रवादी आणि तशा एकूणच सगळ्या पक्षांवर व त्यांच्या नेत्यांवर अनुकूल आणि प्रतिकूल असे सारेच लिखाण आले.
या पक्षांनी घेतलेल्या मध्यवर्ती भूमिका त्यात अधोरेखित झाल्या, त्यांचे खरेखोटे असणे आणि त्याचवेळी त्यांचे टोकाचर असणेही स्पष्टपणे सांगितले गेले. त्याचमुळे हा स्तंभ कोणाला गृहीत धरता आला नाही.
त्याच्यावरच्या रागलोभाचे एक कारण हेही आहे.

पाने २०४ । किंमत रु. २००

संपर्क : साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ३० फोन ०२० २४४५९६३५

# एच. वाय. शारदाप्रसाद यांचे दोन लेख

इंदिरा गांधी पंतप्रधान असतानाच्या सर्व म्हणजे १६ वर्षांच्या काळात त्यांचे 'माध्यम सल्लागार' राहिलेले एच. वाय. शारदाप्रसाद यांचे The Book I Won't Be Writing हे पुस्तक रेखीव लेखनाचा आणि तटस्थ दृष्टिकोनाचा उत्तम नमुना आहे. त्यातील Was the Emergency Unavoidable आणि J. P. हे दोन लेख अनुवाद करून देत आहोत. पहिला लेख त्यांनी आणीबाणीला २० वर्षे झाली तेव्हा (४ जुलै १९९५) लिहिला होता, तर दुसरा लेख जयप्रकाशांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले तेव्हा (२१ ऑक्टोबर २००१) लिहिला होता.

**– संपादक**



**आणीबाणी अपरिहार्य होती काय?**

आणीबाणीविषयी वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार करता येणे अवघड आहे. त्या काळात ज्यांनी तुरुंगवास भोगला, त्यांच्या तीव्र भावना समजून घेता येतात आणि (माझ्यासारखे) जे कोणी दुसऱ्या बाजूला होते, त्यांनासुद्धा त्या कालखंडाविषयी तीव्रतेने काही तरी वाटत असते. पण ज्या शासकीय अधिकाऱ्यांनी त्या काळात सरकारी आदेशांची अंमलबजावणी केली, ते आता असा दावा करीत आहेत की, ''आणीबाणीच्या काळात जे काही अनिष्ट घडत होते, त्यात आमचा सहभाग नव्हता; उलट त्या निर्णयांच्या विरोधात आतून लढणारे 'अनसंग हीरो' आहोत.'' अनेक पत्रकार आज असे सांगत आहेत की, 'त्या वेळी आम्ही सिंहासारखे वागलो'; पण प्रत्यक्षात त्या वेळी त्यांनी मेंढीचे कातडे पांघरले होते. त्या काळात सर्वाधिक धक्कादायक वर्तन विद्यापीठांमधील बुद्धिवंतांचे होते, जे नेहमी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असतात.

जून १९७५ मधील त्या उन्हाळ्याच्या दिवसांत संपूर्ण देश थरारून गेला होता, हे मला चांगले आठवतेय. २५ जूनच्या त्या मध्यरात्री जे थोडे अधिकारी '१, अकबर रोड' बंगल्यातील त्या खोलीत उपस्थित होते, त्यांपैकी मी एक होतो. त्या दिवशी मध्यरात्रीनंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय आणीबाणी पुकारण्यासाठी काढण्यात येणाऱ्या अध्यादेशाला मंजुरी दिली होती.

त्या ऐतिहासिक घटनेला २० वर्षे झाली आहेत आणि आता बिगरकाँग्रेसी नेत्यांचे ओजस्वी वक्तृत्व फुलून आले आहे, वृत्तपत्रांचेही रकाने त्याविषयीच्या बातम्यांनी ओसंडून वाहत आहेत.

या दिवसाला कोणी वुडन ज्युबिली किंवा काउंटर ज्युबिली म्हटले, तर हरकत घेण्याचे कारण नाही; पण मुळात ज्युबिली हा ज्यू लोकांचा उत्सव आहे- इजिप्शियन लोकांशी झालेल्या स्पर्धेत जय मिळाल्यानंतर साजरा करण्याचा उत्सव! अणकुचीदार शिंगे असलेले प्राणी (मेंढ्या) उधळून देणे आणि गुलामांना मोकळे सोडणे, अशा प्रकारचा तो उत्सव होता. गेल्या महिन्यात भारतात जे काही साजरे झाले तो उत्सव मुक्ततेचा नव्हता, तर कैद होण्याची आठवण जागवणारा होता.

ही काउंटर-ज्युबिली ज्या पद्धतीने साजरी झाली ते पाहता, देशातील फार मोठ्या समूहाला १९४२ च्या 'चले

जाव' चळवळीसारखाच हा दिवस वाटत होता. त्यांच्या दृष्टीने १९७५ च्या आणीबाणी काळात ज्यांना तुरुंगात टाकले गेले, त्यांचे स्थान १९४२ ला ज्यांना तुरुंगवास भोगावा लागला त्यांच्यासारखेच आहे. त्या वेळी 'करा किंवा मरा' म्हणणाऱ्या महात्मा गांधींचे जे स्थान होते, ते स्थान या वेळी जयप्रकाश नारायण यांचे होते. आणि १९४२ मध्ये ब्रिटिशांनी ज्या प्रकारचा हिंसाचार केला, त्याच प्रकारे १९७५ मध्ये इंदिरा गांधींचे वर्तन होते.

तर, अशी ही आणीबाणी का लागू केली गेली?

आणीबाणीच्या टीकाकारांच्या मतानुसार, सत्तेची अनिवार तहान आणि राजकीय, नैतिक व कायदेशीर लढाई हरल्यानंतरही पंतप्रधानपदाला चिकटून राहण्यासाठी इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने, न्यायमूर्ती जे.एम.एल.सिन्हा यांनी इंदिरा गांधींचा निवडणुकीतील विजय अवैध ठरवला, तेव्हाच इंदिरा गांधींनी सत्तेवर राहण्याचा हक्क गमावलेला होता.

तेव्हा अनेकांनी असाही प्रश्न उपस्थित केला होता की, इंदिराजींच्या निवडणुकीत सहभागी झालेल्या अधिकाऱ्याचा राजीनामा दोन दिवस उशिरा स्वीकारला गेला, या तांत्रिक चुकीला भ्रष्टाचार म्हणणे योग्य आहे काय? पण तरीही, पंतप्रधानांची निवडणूक अवैध ठरवली जाणे हे प्रकरण गंभीर होते, हे खरे.

राजकीय अंकगणित साधे-सरळ नसते. मी हे कबूल करतो की, त्या वेळी चालू असलेल्या 'सत्याग्रहाला' केंद्र सरकारकडे काहीही उत्तर नव्हते आणि म्हणून आणीबाणी लादण्याचा निर्णय झाला. सर्वच सरकारे सारखीच वागतात, जर त्यांना आव्हान दिले गेले तर; मग ते सत्ताधारी परकीय असोत वा मतदान पत्रिकांद्वारे निवडून आलेले स्वकीयांचे सरकार असो! बळाचा वापर करणे हे त्यांचे सत्याग्रहाला उत्तर असते आणि बळाचा वापर करण्यासाठी कायद्यामध्ये व घटनेमध्ये तरतुदी असतातच असतात. जयप्रकाश नारायण यांनी जनतेला असहकाराचे आवाहन केले, तेव्हा निर्माण झालेले आव्हान मोडून काढण्यासाठी सरकारच्या साह्याला भारतीय राज्यघटनेतील ३५२ वे कलम होतेच. आणि इंदिरा गांधींना असे वाटत होते की, राज्यव्यवस्थेचे संरक्षण करणे हे केंद्र सरकारचे कर्तव्यच आहे.

इंदिरा गांधी सत्याग्रह आंदोलनाशी अपरिचित नव्हत्या. उलट, सत्याग्रहाच्या ताकदीला त्या खूपच चांगल्या प्रकारे ओळखून होत्या. काही महिने आधीच मोरारजी देसाई यांनी गुजरातमध्ये बेमुदत उपोषण सुरू केले होते, तेव्हा 'कोणत्याही प्रकारे तडजोड घडवून आणा' असे सांगून उमाशंकर दीक्षित यांना मोरारजींच्या भेटीला धाडले होते. पण जयप्रकाशांनी



निर्माण केलेले आव्हान खूपच गंभीर होते, ते आंदोलन तत्काळ इलाज करण्याची मागणी करणारे होते. आणि त्यातच भर पडली ती, जिथे दहा युनिट बळ वापरायचे तिथे शंभरांचा वापर करण्याच्या इंदिरा गांधींच्या सवयीची. त्याचा परिणाम आणीबाणीचा निर्णय घेण्यात झाला.

पण घटनात्मक तरतुदी आणि कायदे यांच्याविषयीचे इंदिरा गांधींचे ज्ञान अधिक चांगले असते, तर कदाचित त्यांनी आणीबाणी लागू करण्याचा निर्णय घेतलाही नसता. या अशा अभावग्रस्ततेमुळे इंदिरा गांधींना सल्लागारांवर व कायदेतज्ज्ञांवर अधिक अवलंबून राहावे लागले आणि त्या लोकांनी जरा अधिकची काळजी घेण्याची गरज पटवून देऊन, आणीबाणीचा निर्णय घेण्यास प्रवृत्त केले. राजकीय सल्लागार आणि आरोग्याची काळजी घेणारा सर्जन यांच्यात एक महत्त्वाचा फरक असतो. डॉक्टरने चुकीचे निदान केले, तर झालेल्या नुकसानीचे खापर त्याच्याच माथी फोडले जाते. पण जेव्हा राजकीय सल्लागाराकडून चुकीचा सल्ला दिला जातो आणि तो सल्ला स्वीकारला जातो, तेव्हा झालेले नुकसान राजकीय नेत्याच्याच नावावर नोंदवले जाते. त्याची शिक्षा सल्लागाराला नाही, तर राजकीय नेत्यालाच भोगावी लागते.

आणीबाणी लागू करण्याचा इंदिरा गांधींचा निर्णय जितका अचानक आणि अनपेक्षित होता; तितकाच, किंबहुना अधिक अनपेक्षित व नाट्यपूर्ण निर्णय होता आणीबाणी उठवण्याचा. इंदिरा गांधींनी स्वत:ची सत्ता टिकविण्यासाठी आणीबाणी लादली, असे ठाम मत राजकीय पंडितांचे आहे. पण, त्यांपैकी अनेक जण असे म्हणतात की, आणीबाणी उठवण्यामागेही तीच प्रेरणा होती (म्हणजे पुन्हा सत्तेवर येण्याची); तेव्हा तो युक्तिवाद फारसा पटत नाही.

असे असू शकते का, की- आणीबाणीमुळे अपेक्षित परिणाम साधला गेलेला नाही, ज्या भूमिकेत वावरावे लागत आहे ते अस्वस्थ करणारे आहे, आणि राजकीय अनिश्चितता संपुष्टात आणावी अशी नैतिक भावना जागृत झाली; म्हणून आणीबाणी उठवून निवडणुका जाहीर करण्याचा निर्णय इंदिरा गांधींनी घेतला? पण या विस्मयचकित करणाऱ्या प्रश्नावर प्रकाश पडू शकेल, अशी रोजनिशी इंदिरा गांधींनी ठेवलेली नाही.

राजकीय भाष्यकार असे म्हणतात की, 'नव्याने निवडणुका घेतल्या तर आपण प्रचंड बहुमताने विजयी होऊ, असा आत्मविश्वास इंदिरा गांधींना वाटत होता.' पण त्यांच्या जवळच्या लोकांना असे वाटते की, इंदिरा गांधींना तशी खात्री नव्हती. आपण निवडणुकीत पराभूत होणार, याचा अंदाज त्यांना आला होता; विशेषत: निवडणूक प्रचाराने जोर पकडला तेव्हा.

पण अशीही एक शक्यता आहे की, आणीबाणी लादण्याच्या चुकीच्या निर्णयाचे प्रायश्चित्त म्हणून आणीबाणी उठवण्याचा निर्णय त्यांनी घेतला असेल. आणि विचित्र योग असा आला की, आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी विरोधकांना ज्या प्रकारची वागणूक दिली, तशीच वागणूक नंतर जनता पक्षाच्या सरकारने इंदिरा गांधींना दिली. त्यामुळे 'बरोबरी झाली' असे लोकांना वाटले आणि म्हणून जनता सरकारच्या पतनानंतर लोकांनी पुन्हा इंदिरा गांधींना निवडून दिले.

एक गोष्ट मात्र इंदिरा गांधींनी साध्य केली; ती म्हणजे, भविष्यकाळात कोणताही पंतप्रधान आणीबाणी लागू करण्याची हिंमत करणार नाही.

### जे. पी. : राष्ट्राची सदसद्विवेकबुद्धी

जॉर्ज बुश आणि ओसामा बिन लादेन यांच्याविषयी भरभरून लिहिण्यात गुंतून पडलेल्या वृत्तपत्रांनी गेल्या आठवड्यातील एका घटनेकडे दुर्लक्ष केले. पुढील वर्षभर चालणाऱ्या जयप्रकाश नारायण जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ करणारा तो समारंभ होता. बनारस येथे आयोजित केलेल्या त्या समारंभाला पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी आणि माजी पंतप्रधान चंद्रशेखर या तिघांची प्रमुख उपस्थिती होती. केवळ दोन-तीन वृत्तपत्रांनी त्याची बातमी दिली. कदाचित दूरचित्रवाहिन्यांवर त्याबाबत दाखवले-सांगितले गेले असेल; पण मी ज्या वाहिन्या पाहिल्या, त्यांवर तरी तसे काही दाखवले गेले नाही.

११ ऑक्टोबर १९०२ रोजी जयप्रकाश नारायण यांचा जन्म झाला; त्यामुळे त्यांची जन्मशताब्दी प्रत्यक्षात पुढच्या वर्षी आहे. पण आपल्या देशात अशी प्रथाच पडून गेली आहे की, ९९ व्या जन्मदिवसाला १०० वा जन्मदिवस मानले जाते. (क्रिकेटमध्येही असे झाले तर बरे होईल, अशी इच्छा अनेक फलंदाजांच्या मनात असेल.) पण, ते असो. झालेल्या चुकीची दुरुस्ती करून घेण्यासाठी वृत्तपत्रांच्या हाताशी भरपूर वेळ आहे आणि मला खात्री आहे की, सर्व संपादक तसे करतील. सरकारने स्थापन केलेल्या नॅशनल कमिटीने पुढील वर्षासाठी काय नियोजन केले आहे, ते आपल्याला अद्याप माहीत नाही; पण पुढच्या ऑक्टोबर महिन्याची वाट आपण पाहू शकतो, त्या वेळी वृत्तपत्रांतून जयप्रकाशांविषयी व त्यांच्या कार्याविषयी अनेक लेख प्रसिद्ध होण्याची!

'सिलेक्टेड वर्क्स ऑफ जयप्रकाश नारायण' या ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत त्या खंडाचे संपादक प्रा.विमल प्रसाद म्हणतात- भारताच्या सार्वजनिक जीवनात जयप्रकाशांचे स्थान केवळ जवाहरलाल नेहरूंच्यानंतर आहे. म्हणजे, या शतकातील महान भारतीय नेत्यांमध्ये जयप्रकाशांचे स्थान तिसऱ्या क्रमांवर आहे. सरदार पटेल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व नेताजी सुभाषचंद्र बोस या तिघांचे कट्टर अनुयायी वगळता बहुतांश लोक वरील दाव्याशी सहमती दाखवतील. पण एक गोष्ट विशेष नोंदवण्यासारखी आहे की, या भारतभूमीतील तीन सर्वश्रेष्ठ व्यक्तींपैकी एकानेच केवळ सत्तेचे पद सांभाळले आहे; अन्य देशांत असे क्वचितच आढळते. आपला इतिहास पाहिला तर असे दिसते की, राजापेक्षा ऋषींना आणि सम्राटापेक्षा संन्याशाला अधिक मान मिळत आला आहे. वसाहतवादाच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी जनतेचे नेतृत्व करून, स्वातंत्र्य प्राप्त केल्यानंतर सर्वोच्च पद नाकारणारा गांधी हा कदाचित जगातला एकमेव नेता असावा. आणि जयप्रकाशांनीही आपल्या मोठ्या गुरुबंधूचा नाही, तर गुरूंचा मार्ग अनुसरला. हे सर्वपरिचित आहे की, जवाहरलाल नेहरूंनी स्वत:चे हात बळकट करण्यासाठी जयप्रकाशांना एकदा नाही तर अनेक वेळा मंत्रिमंडळात सहभागी होण्याचे आमंत्रण दिले होते आणि प्रत्येक वेळी जयप्रकाशांनी नकार दिला होता. त्या वेळी फार मोठ्या प्रमाणात असेही मानले जात होते की, जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर जयप्रकाशांकडे पंतप्रधानपद जाईल. जयप्रकाशांमध्ये ती क्षमता होती, यात शंकाच नाही. त्यामुळे जयप्रकाशांच्या सततच्या नकारामुळे काँग्रेसमधील डाव्या विचाराच्या प्रवाहाची निराशा झाली होती. त्या प्रवाहाला जयप्रकाशांनी वाऱ्यावर सोडले, अशीही भावना व्यक्त झाली होती. उजव्या प्रवाहाचे नेते आणि कम्युनिस्टांचे लोकही हेटाळणीच्या सुरात असे म्हणत असत की- जयप्रकाश हे बोलणारे नेते आहेत, करून दाखवणारे नाहीत! पण जयप्रकाशांसाठी राजकारणाचा अर्थ वेगळा होता. राजकारणाकडे ते सत्ता मिळवण्याचे आणि चालवण्याचे साधन म्हणून पाहत नव्हते; तर जनतेच्या भल्यासाठी व शोषितांना मुक्त करण्यासाठी वापरण्याचे हत्यार म्हणून ते राजकारणाकडे पाहत होते. जर तुम्ही सरकारमध्ये सहभागी असाल, तर काही चुकीचे निर्णय झाले तरी त्यांचे समर्थन करणे तुम्हाला भाग पडते आणि सत्ता राबविणाऱ्यांना तसे वर्तन स्वाभाविक वाटते. पण तुम्ही सत्तेबाहेर असाल तर सत्ताधाऱ्यांच्या गैरवर्तनाबाबत, चुकीच्या निर्णयांच्या विरोधात आवाज उठवू शकता, असा जयप्रकाशांचा विचार होता.



आणि म्हणूनच दरम्यानच्या काळात ते राष्ट्राची सदसद्‌विवेकबुद्धी जागृत ठेवणारे नेते बनले; देशाचा प्रमुख रखवालदार नव्हे! लोकांना असे मनापासून वाटत असे की, सरकारवर जेपी टीका करताहेत ती सत्तेवर येण्यासाठी नव्हे; तर स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी- ''माणसाचे स्वातंत्र्य- सर्वत्र आणि सर्व प्रकारचे, सर्वांपासूनचे. मानवी मनाचे स्वातंत्र्य, आत्म्याचे स्वातंत्र्य.'' हे शब्द जयप्रकाशांचेच आहेत.

जयप्रकाशांनी देशाची विवेकबुद्धी जागृत ठेवली; पण त्यांच्या सभोवताली ज्या प्रकारची माणसे होती, त्याबद्दल मात्र नेहमीच प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. जयप्रकाश स्वत:च्या आंतरिक व्यक्तिमत्त्वाशी पूर्णत: प्रामाणिक राहिले; पण त्यांनी आपला अजेंडा, दृष्टिकोन आणि प्राधान्यक्रम (जरा जास्तच) सातत्याने बदलले. अर्थात, ते बदल त्यांनी कोणत्याही व्यक्तिगत स्वार्थासाठी केले नाहीत. ते अमेरिकेत सात वर्षे इतका दीर्घ काळ विद्यार्थी म्हणून राहिले; तेव्हा त्यांनी कम्युनिझमची दीक्षा घेतली. (जयप्रकाश हे भारतातील अशा थोड्या नेत्यांपैकी आहेत, ज्यांनी उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला नव्हे तर अमेरिकेला जाणे पसंत केले. तेथील ओहिओ विद्यापीठातून त्यांनी समाजशास्त्रात एम.ए. केले होते.) पण भारतात परतल्यानंतर काहीच महिन्यांनंतर त्यांना कम्युनिझमबद्दल असमाधान वाटू लागले; विशेषत: 'मॉस्को'कडून आदेश मिळवणाऱ्या भारतातील कम्युनिस्टांच्याविषयी त्यांच्या मनात नाराजी निर्माण झाली. आणि मग काँग्रेस सोशलिस्ट पार्टीची स्थापना करून एक दबावगट म्हणून काम करताना जयप्रकाशांनी काँग्रेसमधील उजव्या प्रवाहाच्या विरोधात नेहरूंच्या समर्थनाची भूमिका स्वीकारली. अर्थात, तेव्हाही वर्गसंघर्षाचा सिद्धांत आणि उत्पादनाची साधने सरकारच्या मालकीची ठेवण्याची गरज, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. एवढेच नाही तर, या दोनही बाबी शास्त्रीय आहेत, असा त्यांचा दावा होता. पण त्यानंतर थोड्याच काळाने त्यांनी वर्गसंघर्षाच्या भूमिकेचा त्याग केला, संपत्तीचे विश्वस्त ही संकल्पना स्वीकारली आणि विनोबा भावे व त्यांची भूदान चळवळ यासाठी स्वत:ला समर्पित करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळी त्यांनी राजकारणातून पूर्णत: निवृत्त झाल्याची घोषणा केली, पण १९७० नंतर त्यांनी संपूर्ण क्रांतीचा नारा दिला आणि आधी गुजरात सरकार व नंतर केंद्र सरकार उखडून टाकण्यासाठी राजकारणात पुन:प्रवेश केला. त्यांची ही कृती इंदिरा गांधींना आणीबाणीच्या निर्णयाकडे जाण्यास भाग पाडणारी ठरली. इंदिरा गांधींचा १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यावर जयप्रकाशांचा नैतिक अधिकार व त्यांचे सामर्थ्य यामुळेच केवळ अनेक विरोधी पक्षांना आपापले स्वतंत्र अस्तित्व सोडून 'जनता पार्टी' या बॅनरखाली एकत्र येणे भाग पडले. पण विचित्र योग असा की, सांप्रदायिक राजकारणाबद्दल ज्या माणसाच्या मनात सखोल तिडीक होती, तोच माणूस जनसंघाला पवित्र करून घेण्यास व सत्तेत वाटा मिळवून देण्यास कारणीभूत ठरला.

ज्यांना १९७७ च्या निवडणुकीत जयप्रकाशांमुळे फायदा झाला; त्यांना नंतर त्यांची गरज राहिली नाही, उपयोगिता वाटली नाही. त्यांनी 'लोकनायक' (ते खरोखर होतेच) हे संबोधन वापरून जयप्रकाशांना महान ठरवले आणि बाजूला ठेवून दिले. मग नव्या सत्ताधाऱ्यांशी सल्लामसलत करण्याऐवजी जयप्रकाशांचा बहुतांश वेळ 'डायलिसिस' मशिनवरच जाऊ लागला. अर्थातच, नवे सत्ताधारी त्यांना त्रास देऊ इच्छित नव्हते. जयप्रकाशांना मृत्यूचे आमंत्रण येण्यापूर्वीच जनता पक्षाची वाताहत झाल्याचे पाहायला मिळाले; पण त्याच इंदिरा गांधींच्या हातून जनता पार्टीचा पराभव झालेला पाहण्यासाठी ते जिवंत राहिले नाहीत.

दोनेक वर्षांपूर्वी एका ज्येष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्याने म.गांधी यांच्यावर पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने लिहिले आहे की, गांधीजींचे संपूर्ण आयुष्य हे अखेर अपयशीच म्हणावे लागेल. होय, अखंड भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात गांधीजींना अपयश आले. आणि जीनांचे आयुष्य मात्र यशस्वी ठरले आहे, कारण पाकिस्तान मिळवण्यात त्यांना यश मिळाले आहे. पण कोणत्याही प्रकारच्या अपयशामुळे गांधीजींच्या शिकवणुकीचे महत्त्व नष्ट होऊ शकणार नाही. कारण क्रुसावर चढवल्या गेलेल्या ख्रिस्ताच्या शिकवणुकीचे महत्त्व नष्ट झालेले नाही. आणि कोणत्याही चांगल्या माणसाचे आयुष्य अपयशीच असते, कारण या पृथ्वीतलावर इतकी चांगली माणसे येऊन गेली तरी सैतानी प्रवृत्ती नष्ट झालेली नाही. जयप्रकाश नारायण हेही त्यांचे ध्येय गाठण्यात अयशस्वी ठरले असतील; पण कमालीचा आर्जवी चेहरा, आश्वासक आवाज, दृष्टीची विशालता व अनुकंपा आणि भ्रष्टाचार, गैरमार्ग, स्वार्थ यांपासून संपूर्ण स्वातंत्र्य या सर्वांच्या मिश्रणातून जो प्रसिद्ध 'जे.पी.करिश्मा' आकाराला आला होता, तो बराच काळ प्रेरणा देत राहील.

(अनुवाद : विनोद शिरसाठ)

# इंदिरा गांधींना अनावृत पत्र

**जयप्रकाश नारायण**



''नाही, प्रधानमंत्री महोदया, सरकार उलथवून टाकण्याची कोणतीही योजना शिजलेली नव्हती. हो, योजना असलीच तर ती इतकीच साधी होती की सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा होईपर्यंत चळवळ चालू ठेवायची. २५ जून १९७५ ला रामलीला मैदानावर नानाजी देशमुखांनी जाहीर केली ती योजना एवढीच साधी, सरळ होती. माझ्या त्या दिवशीच्या भाषणाचा विषयही तोच होता. काही निवडक मंडळींनीच तुमच्या निवासासमोर सत्याग्रह करायचा होता. सर्वोच्च न्यायालयाकडून अखेरचा निवाडा होईपर्यंत तुम्ही प्रधानमंत्रिपद सोडावे, ह्या मागणीच्या समर्थनार्थ तो सत्याग्रह होता.''

**प्रिय पंतप्रधान,**

वृत्तपत्रांतील तुमच्या भाषणांचे वृत्तान्त आणि तुमच्या मुलाखती ज्या धडाक्याने सुरू आहेत, त्यांनी मी थक्क झालो आहे! आपल्या कृतींच्या समर्थनार्थ उठता-बसता काही ना काही सांगण्याची पाळी आपल्यावर येते, त्याच्या बुडाशी आपल्या चुकीच्या कृत्यामुळे अपराधाच्या जाणिवेने त्रस्त झालेले मन आहे, हेच सिद्ध होते. वृत्तपत्रांची तुम्ही केलेली मुस्कटदाबी, मतभिन्नतेची तुम्ही वळलेली गठडी यामुळे तुम्हांला अवघे रान मोकळे सापडले आहे. खुशाल वडाची साल पिंपळाला चिकटवावी, वाटेल ते खोटेनाटे बोलावे, त्याचा प्रतिवाद कोण करणार? आणि त्याचे वाभाडे तरी कसे काढणार! त्या आरोपांचा जाहीरपणे इन्कार करायलादेखील तुम्ही वाव ठेवलेला नाही. अशा रीतीने लोकांना बनवता येईल आणि लोक आपल्या युक्तिवादाला फसतील, अशा भ्रमात तुम्ही वावरत असाल, तर ते चूक ठरेल. विरोधी पक्षांची ही बदनामी पचणार नाही, याची कसोटी पाहायची असेल तर हातच्या कांकणाला आरसा कशाला? आणीबाणी उठवा, लोकांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळू द्या; वृत्तपत्रांना त्यांचे स्वातंत्र्य परत करा; तुरुंगात डांबलेल्या लोकांना मोकळे करा आणि मग पहा गंमत! ह्या मंडळींना तुरुंगात का डांबले? काय त्यांचा गुन्हा होता? आपल्या कर्तव्याला ते जागले म्हणून त्यांना बंदिशाळेचा रस्ता तुम्ही दाखवला. जनतेने थोडीथोडकी नाही, तब्बल नऊ वर्षे तुमच्या अंमलाखाली कंठली आहेत. लोकांना बावळट समजू नका. त्यांना एक सहावे इंद्रिय आहे आणि त्यामुळे तुमच्या ह्या नगाऱ्याच्या आवाजातही सत्याची चाहूल त्यांना लागल्यावाचून राहणार नाही.

तुमच्या गाण्याचे जे पालुपद मला समजले ते असे : (अ) सरकारी कारभार ठप्प करण्याचा विरोधकांचा बेत होता. (ब) लष्करी आणि मुलकी दलांत अप्रीती निर्माण करण्याची धडपड एक मनुष्य करीत होता. हे झाले पालुपद; पण त्याशिवाय इतरही काही किरकोळ पदे आहेत. लोकशाहीहून राष्ट्र महत्त्वाचे आहे असे तुमच्या बोलण्यात वारंवार येते. सामाजिक लोकशाही भारतीय प्रकृतीला कितपत उपयुक्त ठरेल, याबद्दलही संभ्रम निर्माण करण्याचा तुमचा उद्योग उत्साहाने चालूच आहे.

या सर्व घडामोडींत खलनायकाची भूमिका मी वठवली असा घोशा आपण लावलेला असल्याने काही गोष्टींबाबत एकदा स्पष्टीकरण देणे युक्त होईल. अर्थात त्याचा आपल्यावर

फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही, हे मला ठाऊक आहे. घालवडेपणा करणाऱ्यांची समजूत कोण आणि कशी काढणार? जिथे जाणूनबुजून सत्यापलाप केला जातो आणि अपसमज पसरवले जातात, तिथे खऱ्याखोट्याची शहानिशा कशी होणार? पण सत्याची एकदा नोंद तरी झालेली बरी.

सरकारी कारभार ठप्प करण्याचा आरोप बिनबुडाचा आहे. तशी कोणतीही योजना आखण्यात आलेली नव्हती आणि ही गोष्ट तुम्हांला पक्की ठाऊक आहे. पण एकदा वस्तुस्थिती सांगतोच : भारतात फक्त बिहार राज्यातच काय ती जनता चळवळ चालू होती आणि तिथेदेखील चळवळ संपुष्टात आल्यासारखीच होती असा हवाला त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्वत:च दिला आहे. खरे तर त्यांचे म्हणणे अशा प्रकारची चळवळ तिथे कधी नव्हती असेच आहे; पण तुमचे हेरखाते जर कार्यक्षमतेने काम करीत असेल, तर तुमच्या कानी ही गोष्ट निश्चितच आली असली पाहिजे, की ती चळवळ हळूहळू पसरत-झिरपत होती आणि खेडोपाड्यांपर्यंत तिने मूळ धरले होते. माझ्या गिरफदारीपर्यंत 'जनता सरकारे' खेडोपाडी अस्तित्वात येत होती आणि ती हळूहळू वर सरकत होती आणि विकासखंडापर्यंत त्यांचा आवाका वाढला होता. पुढे ही चळवळ जिल्हा आणि राज्यपातळीपर्यंत पोचेल अशी आशा निर्माण झाली होती.

'जनता सरकार'च्या ह्या कार्यक्रमाकडे जरा बारकाईने पाहण्याची इच्छा तुम्ही बाळगली असतीत, तर बव्हंश कार्यक्रम रचनात्मक आहे हे तुमच्या ध्यानी यायला हरकत नव्हती. सार्वजनिक वाटपाची नीट व्यवस्था करणे; प्रशासनात खालच्या पातळीवर शिरलेल्या भ्रष्टाचाराला अटकाव करणे; भूमिविषयक कायद्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून खटपट करणे; लोकांचे आपसातले तंटेबखेडे समजूतदारपणाने व सल्लामसलतीने सोडवण्याच्या परंपरागत पद्धतीचे पुनरुज्जीवन करणे; दलितांशी माणुसकीने वागणे, तिलक आणि दहेज म्हणजे हुंडा यांसारख्या दुष्ट रूढी निपटून काढणे, हे सगळे कार्यक्रम समाजाची नवरचना घडवणारे म्हणजे रचनात्मकच होते. आता या कार्यक्रमांना सरकार उलथवून टाकण्याचे कार्यक्रम म्हणायचे कोणी ठरवले तर त्यांचे तोंड कोण धरणार? तसे म्हणणे म्हणजे स्वैर कल्पनाशक्तीचा खेळ आहे. ज्या ठिकाणी जनता सरकार सुदृढ होते अशा ठिकाणीच काय तो करबंदीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. चळवळ जेव्हा शहरी भागांत ऐन भरात होती, तेव्हा काही दिवस सरकारी कचेऱ्यांचे कामकाज निदर्शने आणि धरणे यांच्या साह्याने बंद



पाडण्याचा प्रयत्न झाला. विधानसभेच्या अधिवेशनाच्या वेळी आमदारांनी राजीनामे द्यावेत आणि अधिवेशनाला हजर राहू नये, यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न शांततापूर्ण मार्गाने करण्यात आला. सविनय कायदेभंगाच्या स्वरूपाचे हे कार्यक्रम हाती घेण्यात आले होते आणि त्यापायी हजारो लोकांनी तुरुंगवासही पत्करला होता.

इंग्रज सरकार ठप्प करण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात असहकार आणि सत्याग्रह यांचा अवलंब करण्यात येत असे; तसाच प्रयत्न भ्रष्ट आणि लोकमत प्रतिबिंबित करण्याला अपात्र ठरलेल्या बिहार सरकारबाबत केला जात होता. ब्रिटिश सरकार जबरदस्तीने उरावर बसलेले होते; पण बिहार सरकार आणि विधानसभा घटनात्मक मार्गांनी स्थापित झालेल्या होत्या, असा एक युक्तिवाद केला जातो. आणि अशा सरकारला आणि विधानसभेला बरखास्त करण्याची मागणी करण्याचा कोणाला काय अधिकार आहे, असेही विचारले जाते. हा एक बिनतोड सवाल आपण विचारीत आहोत, असे शासकांना वाटते; पण हा सवाल किती बाष्कळपणाचा आहे ते लाख वेळा अधिकारी व्यक्तींनी सांगितले आहे. आणि ह्या व्यक्तींत घटनातज्ज्ञ वकील मंडळीदेखील आहेत. सरकार भ्रष्ट असेल आणि धडपणे राज्य करण्याला अपात्र असेल; तर त्याचा राजीनामा मागण्याचा सार्वभौम प्रजेला अधिकार लोकशाहीत पोचतो आणि असे सरकार चालू देण्याचा उद्योग विधानसभा करीत असेल तर ती विधानसभा बरखास्त करावी अशी मागणी करण्यातही काहीच गैर नाही. लोकांना चांगले प्रतिनिधी निवडून पाठवण्याची त्यामुळे संधी मिळते.

पंतप्रधान आणि मुख्यमंत्री स्वत:च्या पसंतीने आपले मंत्रिमंडळ निवडतात आणि संयुक्त जबाबदारीच्या पद्धतीने मंत्रिमंडळाचा कारभार चालतो. पाच वर्षे हा संच अबाधित ठेवला जायला हवा, असे म्हणणेदेखील याच न्यायाने रास्त ठरेल. मग मंत्रिमंडळाच्या पडझडी का होतात? केंद्र सरकारमध्ये तुम्ही आपल्या मंत्रिमंडळात कितीदा खांदेपालट आणि खातेपालट केला? किती राज्यांचे मुख्यमंत्री बदलले आणि त्यांनी आपल्या सहकाऱ्यांमध्ये फरक केला? संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वावर मंत्रिमंडळाचा कारभार चालत असताना आणि आपले सहकारी नीट पारख करून निवडलेले असताना ते अपात्र किंवा अविश्वसनीय कसे ठरतात? त्यांच्याबाबतचा निवाडा करून त्यांना रजा देण्याचा अधिकार जर नेत्यांना पोचतो, तर सार्वभौम जनतेला मुदतीपूर्वी अपात्र आणि अविश्वसनीय प्रतिनिधींना जागा खाली करायला सांगण्याचा अधिकार असावा, असे म्हणण्यात गैर काय आहे?

शक्यता अशी आहे की खांदेपालट आणि खातेपालट करताना त्या माणसांच्या पात्रतेचा आणि विश्वसनीयतेचा विचार करण्यापेक्षा आपल्या सोयी-गैरसोयीचा विचार अधिक केला जात असेल, आणि त्यांच्या स्वत:च्या लहरीदेखील प्रभावी ठरत असतील. आपल्या सोयीने पाच वर्षे काम करण्याचे अधिकार जनतेने दिलेले असून संसद आणि विधानसभा ज्यांनी बरखास्त केल्या आणि जनतेने दिलेल्या काळापेक्षा जे अधिक काळ सत्तेवर राहिले त्यांनी तरी नाकाने कांदे सोलू नयेत; पण सत्ता हेच ज्यांना शहाणपणाचे गमक वाटते. त्यांना कोण काय सांगणार? आणि जाहीरपणे ते सांगण्याचा अधिकार छिनून घेतल्यानंतर कसे सांगणार?

लोकांना काय हवे, याची खातरजमा कशी करून घेणार? लोकशाही पद्धतीने अशी खातरजमा करून घेता येते. बिहारमध्ये पाटण्यात आणि इतरत्र जी प्रचंड शांततापूर्ण निदर्शने आणि मेळावे झाले, राज्यभर मतदार संघांतून ज्या हजारो सभा झाल्या, तीन दिवस बिहार बंद झाला, ४ नोव्हेंबरला ज्या घटना घडल्या, १८ नोव्हेंबरला गांधी मैदानात जी अभूतपूर्व अशी अतिप्रचंड सभा झाली, त्यांतून लोकमत स्पष्टपणे प्रकट झाले. पण बिहार सरकार आणि काँग्रेसच्या बाजूने अशा प्रकारे लोकमत प्रकट झाले काय? १० नोव्हेंबरला जी प्रतिनिदर्शने म्हणून करण्यात आली, त्यांची कळा काय होती? देवकांत बारुआसाहेबांनी त्यासाठी जीव तोडून मेहनत केली आणि सात लाखांवर उधळपट्टी करण्यात आली म्हणतात, त्याची स्थिती काय होती? हा पुरावा पुरेसा वाटत नसेल तर सार्वमत घ्या, असे मी वारंवार सुचवले होते. पण लोकांपुढे अशा रीतीने जाण्याची हिंमत तुमच्यात नव्हती.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख मला या ठिकाणी केला पाहिजे. त्यामुळे अशा तऱ्हेच्या चळवळींवर चांगल्या प्रकारे प्रकाश पडेल. बिहारच्या विद्यार्थ्यांनी लहर लागली म्हणून गमतीखातर चळवळ सुरू केली नाही. त्यांनी एक प्रातिनिधिक परिषद घेऊन आपल्या मागण्यांचा मसुदा तयार केला. नंतर ते शिक्षणमंत्री आणि मुख्यमंत्री यांना जाऊन भेटले. त्यांच्या अनेक बैठका झाल्या; पण भ्रष्ट आणि अपात्र बिहार सरकारला त्यातील गांभीर्य जाणवले नाही.

मग विद्यार्थ्यांनी विधानसभेला घेराव घातला. त्या दिवशी ज्या दुर्दैवी घटना घडल्या त्यातून बिहारची चळवळ आकाराला आली; पण त्या वेळीही विद्यार्थ्यांनी मंत्रिमंडळाच्या हकालपट्टीची किंवा विधानसभा बरखास्त करण्याची मागणी केलेली नव्हती. त्यानंतर सरकारने अटका, लाठीमार, गोळीबार यांचे सत्र आठवडेच्या आठवडे सुरू ठेवले, तेव्हा विद्यार्थी कृती समितीला ह्या मागण्या करण्यावाचून गत्यंतरच राहिले नाही. ह्या ठिकाणी परिसीमा झाली.

वाटाघाटींनी प्रश्न सोडवण्याची पुरेशी संधी बिहार सरकारला देण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या मागण्यांपैकी कोणतीही मागणी बेफाट आणि मान्य न करता येण्यासारखी नव्हती. पण बिहार सरकारने दांडगाईचा मार्ग पत्करला. अभूतपूर्व अशी दडपशाही केली. उत्तरप्रदेशातही याचीच आवृत्ती निघाली. दोन्ही ठिकाणी वाटाघाटींनी प्रश्न सोडवण्याला सरकारतर्फेच नकार देण्यात आला आणि त्यांनी लोकांवर लढा लादला. त्यांनी अधिक समजूतदारपणा दाखवला असता तर चळवळ झालीच नसती.

या सरकारांनी असा शहाणपणा का दाखवला नसावा, याबद्दल मी मनाशी किती वेळा विचार केला, पण ते कोडे काही सुटले नाही. शेवटी ह्या निष्कर्षाला मी आलो की, या सर्वांच्या मुळाशी भ्रष्टाचार आहे. सरकारला हा भ्रष्टाचार निपटून काढण्यात यश आले नाही. मुख्यत: वरिष्ठ पातळीवरच्या भ्रष्टाचाराला ते अटकाव करू शकले नाही. खुद्द मंत्रिपातळीवरदेखील भ्रष्टाचार बोकाळला होता. या सर्व चळवळीचा केंद्रबिंदू भ्रष्टाचार हाच होता. सरकार आणि प्रशासन यांत भ्रष्टाचाराचा झालेला बुजबुजाट लोकांना असह्य झाला होता. पण तरीही बिहार सोडून अन्य दुसऱ्या कोणत्याही राज्यात म्हणावी अशी चळवळ नव्हती. उत्तर प्रदेशात एप्रिलपासून सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली असली तरी जनतेची चळवळ म्हणण्याइतके विराट स्वरूप तिला आलेले नव्हते. इतर काही राज्यांत संघर्ष समित्या स्थापन झाल्या, तरी जनतेची चळवळ सुरू करण्याची फारशी शक्यता कुठेही नव्हती. लोकसभेच्या निवडणुका जवळ येत असल्याने, काँग्रेसेतर पक्षही त्या लढाईच्या तयारीत गुंतले होते. सविनय कायदेभंगाची चळवळ करण्याचे त्यांच्या मनातदेखील नव्हते. सरकारचे उच्चाटन करण्यासाठी मंडळी कटिबद्ध झाली होती, असा डांगोरा आपण खुशाल पिटा; पण तसे काही नव्हते. आपली स्वत:ची हुकूमशाही समर्थनीय ठरवण्याचा तुमचा तो सारा आटापिटा आहे, एवढाच त्याचा अर्थ आहे.

पण घटकाभर युक्तिवादासाठी आपण समजून चालू या, की खरोखरच सरकार उलथवून टाकण्याचा विरोधकांचा बेत होता; पण या मसलतीत तुमचे एक ज्येष्ठ माजी सहकारी आणि उपपंतप्रधान मोरारजी देसाई आणि श्री.चंद्रशेखर यांच्यासारखे काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्यही सामील झाले होते, असे प्रामाणिकपणे तुम्हांला वाटते काय? मग या मंडळींना आणि त्यांच्याचसारख्या इतर अनेकांना तुरुंगात डांबण्याचे प्रयोजन काय?

''नाही, प्रधानमंत्री महोदया, सरकार उलथवून टाकण्याची कोणतीही योजना शिजलेली नव्हती. हो, योजना असलीच तर ती इतकीच साधी होती की सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा होईपर्यंत चळवळ चालू ठेवायची. २५ जून १९७५ ला रामलीला मैदानावर नानाजी देशमुखांनी जाहीर केली ती योजना एवढीच साधी, सरळ होती. माझ्या त्या दिवशीच्या भाषणाचा विषयही तोच होता. काही निवडक मंडळींनीच तुमच्या निवासासमोर सत्याग्रह करायचा होता. सर्वोच्च न्यायालयाकडून अखेरचा निवाडा होईपर्यंत तुम्ही प्रधानमंत्रिपद सोडावे, ह्या मागणीच्या समर्थनार्थ तो सत्याग्रह होता. हा कार्यक्रम दिल्लीत एक आठवडाभर चालणार होता. त्यानंतर इतर राज्यांत तो हाती घेण्यात येणार होता. आणि सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा होईपर्यंत तो चालायचा होता. यात सरकार उलथवून टाकण्याचा किंवा घातपाताचा संबंध येतोच कुठे, हे मला समजत नाही. लोकशाहीमध्ये नागरिकाला सविनय कायदेभंगाचा अधिकार, इतर सर्व मार्ग खुंटले म्हणजे, असलाच पाहिजे. अशा प्रसंगी कायद्याने मिळणारी सजा सत्याग्रही स्वेच्छेने आणि आनंदाने पत्करतो. महात्मा गांधींनी लोकशाहीला दिलेली ही एक महान देणगी आहे. गांधींच्या देशातच तिची अशी विटंबना व्हावी, ही केवढी विलक्षण नियती आहे!

आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्याची दखल घ्यायला पाहिजे. तुम्ही आपल्या सत्तास्थानी निमूटपणे राहिला असतात, तर विरोधी पक्षाच्या मंडळींच्या डोक्यांत कदाचित ही सत्याग्रहाची कल्पनादेखील आली नसती; पण तेवढा धीर तुमच्याच्याने धरवला नाही. आपल्या हस्तकांकरवी तुम्ही आपल्याला पाठिंबा आहे हे दाखविण्यासाठी मेळावे आणि निदर्शने यांचे नाटक सुरू केलेत. त्या मेळाव्यांपुढे आत्मसमर्थनपर खरेखोटे युक्तिवाद मांडले. तुमच्याच घरासमोर दिवसाढवळ्या उच्च

न्यायालयातील न्यायमूर्तीची प्रतिमा जाळण्यात आली. न्यायमूर्ती आणि अमेरिकन हेरखाते सी.आय.ए. यांचे काही साटेलोटे आहे, असे फलक दिल्लीच्या रस्त्यांत लावण्यात आले. असले प्रकार दरोबस्त चालू असताना विरोधी पक्षांना ते निमूटपणे पाहणे केवळ अशक्य होते. त्यांना त्याविरुद्ध पाऊल उचलणे भाग होते. त्यांनी दांडगाईने उत्तर देण्याऐवजी शिस्तबद्ध सत्याग्रहाने व आत्मक्लेशाच्या मार्गाने उत्तर द्यायचे ठरवले, यात चुकले काय? आणि या योजनेमुळे आपला संताप झाला. तुमच्या कल्पनेतल्या सरकार उखडून टाकण्याच्या योजनेचा तो परिपाक नव्हे. या साध्या, सरळ योजनेसाठी लोकांची स्वातंत्र्ये हिरावून घेण्यात आली आणि लोकशाहीच्या नरडीला नख लावण्यात आले. असा आहे हा सारा अजब प्रकार.

आणि वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचा अपहार कशासाठी? भारतीय वृत्तपत्रे बेजबाबदार आहेत, हे काही त्याचे कारण नव्हे. वृत्तपत्रे सत्यापलाप करणारी व सरकारविरोधी आहेत, असेही नाही. स्वातंत्र्य असतानाही इतक्या जबाबदारीने वागणारी वृत्तपत्रे दुसरीकडे क्वचितच दिसतील. त्यांची तर्कसंगत आणि उदार वागणूक राहिली आहे. पण अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर तुमच्या राजीनाम्याच्या प्रश्नाला त्यांच्यापैकी काहींनी हात घातला, म्हणून तुमचा क्रोध असा उसळून आला. तुमचा मिजाज त्यामुळे बिघडला. सर्वोच्च न्यायालयाच्या अवकाशकालीन न्यायमूर्तींच्या निवाड्यानंतर शहरातील एकजात सर्व वृत्तपत्रांनी, अगदी कचखाऊ 'टाईम्स ऑफ इंडिया'नेदेखील, तुम्हांला राजीनामा देण्याचा सल्ला देणारी सयुक्तिक अशी जोरदार संपादकीये लिहिली. तेव्हा वृत्तपत्रीय स्वातंत्र्य पचवणे तुम्हांला असह्य झाले आणि मग तुम्ही बेदरकारपणे त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. वृत्तपत्रीय स्वातंत्र्य म्हणजे लोकशाही जीवनातील जणू प्राणवायू. पण पंतप्रधानांच्या व्यक्तिगत रागापायी स्वातंत्र्याचेच अपहरण करण्यात आले. कल्पनेपलीकडला हा सर्व प्रकार आहे.

प्रधानमंत्रिपदाची प्रतिष्ठा विरोधी पक्षीयांनी कमी केली, असा आपला त्यांच्यावर एक आरोप आहे; पण खरे म्हणजे या पापाच्या धनी आपण स्वत:च आहात. त्या महनीय पदाची अवनती आपल्याइतकी दुसऱ्या कोणीही केली नसेल. निवडणुकीत गैरप्रकारांचा अवलंब केल्याबद्दल संसदेत मतदान करण्याचा अधिकारदेखील न्यायालयाने काढून घेतला अशी व्यक्ती लोकशाही देशात पंतप्रधानपदाची गादी बळकावून बसल्याचे असे दुसरे उदाहरण मिळणे कठीण. (सर्वोच्च न्यायालय कदाचित हा निर्णय फिरवीलदेखील. आज सर्वत्र जे दहशतीचे वातावरण पसरले आहे, त्यात तसे घडणे अशक्य नाही. पण तसे घडून येईपर्यंत तुमचा अपराध आणि मतदानाच्या अधिकारापासूनची फारकत कायमच राहणार आहे.)

सैन्य आणि मुलकी दलांत सरकारबद्दल अप्रीती निर्माण करण्याचा 'सफेद झूठ' आरोप करण्यात येत आहे. त्याचा मी पुन:पुन्हा इन्कार केला आहे. सैन्य आणि मुलकी दलांतील मंडळींनी आपल्या कर्तव्याचे व जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे, हेच तर मी वारंवार बजावले आहे. सैनिकी व पोलिसी कायदा, घटना आणि कायदा यांना धरूनच मी जे काही बोललो ते सर्व सांगितले आहे. मुख्य मुख्य आरोपांना हे झाले उत्तर. आता इतर मुद्द्यांकडे आपण वळू या.

राष्ट्रापेक्षा लोकशाही महत्त्वाची नाही, असे तुम्ही म्हटल्याचे प्रसिद्ध झाले आहे. पंतप्रधान महोदया, हा आपला युक्तिवाद किती तकलादू आहे! जणू काही अवघ्या राष्ट्राची काळजी करण्याचा ठेका आपल्याकडे आहे, अशा तऱ्हेचे हे विधान आहे. आपण आज ज्यांना विनाचौकशी तुरुंगात डांबले आहे, त्यांपैकी कित्येकांनी आपल्यापेक्षा किती तरी अधिक खस्ता या राष्ट्रासाठी खाल्ल्या आहेत. ते सगळे तुमच्याइतके तरी खासच राष्ट्रभक्त आहेत. तेव्हा राष्ट्रभक्तिबद्दल प्रवचने झोडून आमच्या जखमांवर मीठ चोळण्याचा उद्दामपणा तरी कृपा करून करू नका. आणि लोकांपुढे उगा नसते भ्रमजाल उभे करू नका. राष्ट्र आणि लोकशाही यांतून का एकाची निवड लोकांना करायची आहे? राष्ट्राच्या भल्यासाठीच ना २६ नोव्हेंबर १९४९ला लोकांनी घटना परिषदेत जाहीर केले, ''आम्ही भारतीय प्रजानन अशी गंभीरपणे प्रतिज्ञा करतो की, भारत हे एक सार्वभौम लोकशाही गणराज्य असेल आणि त्याच दृष्टीने ही घटना आम्ही अधिनियमित आणि आत्मार्पित करीत आहोत.''

संसदेत कायद्याच्या घालमेली करून किंवा वटहुकूम काढून लोकशाही घटनेला एकाधिकारशाहीचे रूप देता येणार नाही. भारतीय जनताच नवी घटना परिषद बोलावून केला तर तसा बदल करू शकेल. केवळ याच कारणासाठी तशी घटना परिषद मुद्दाम बोलवावी लागेल. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा लाभ, सर्व नागरिकांना घटना पुस्तकावर स्वाक्षऱ्या केल्यानंतर पाव शतकात झाला नसेल, तर त्याचे खापर घटनेवर फोडण्यात अर्थ नाही. त्या पापाचे धनी दिल्लीत पाव शतक राज्यशकट हाकणारेच आहेत. देशात आणि तरुणांत जी बेचैनी आहे त्याच्या

बुडाशी हे मुख्य कारण आहे. दांडगाई आणि दडपशाहीने ही बेचैनी संपुष्टात आणता येणार नाही; आजवरच्या अपयशावर त्यामुळे फक्त कळस चढणार आहे.

सध्या वृत्तपत्रांचे रकाने घोषणाबाजीने चितारलेले असतात. नवी धोरणे, नव्या मोहिमा, उत्साहाची प्रदर्शने यांचा नुसता धूमधडाका सध्या चालू आहे. आजवर जो वेळकाढूपणा केला, त्याची भरपाई करण्यासाठी तुम्ही उतावीळ झाला आहात असे दाखवण्याचा हा सारा खटाटोप आहे. गेल्या नऊ वर्षांतील तुमच्या अमलात जे घडवण्यात तुम्हांला अपयश आले, ते पुसून टाकण्यासाठी हा सारा देखावा उभा केला जात आहे; परंतु तुमच्या 'काही विचारा'तील दहा कलमांची जी वाट लागली, त्यापेक्षा काही वेगळे या वीस कलमांच्या ललाटी लिहिले आहे असे मानण्याचे काही कारण अजून तरी दिसत नाही; पण लोकांना या वेळी पुन्हा बनवता येईल, अशा भ्रमात राहू नका. आणखीही एका गोष्टीची याद मी देऊ चाहतो : बाईसाहेब, स्वार्थलंपट, आणि पाठीला कणा नसणारे होयबा काँग्रेसवाले काही कर्तबगारी दाखवतील, असे समजणे म्हणजे भाकड गाईचे दूध मिळण्याइतकेच दुरापास्त आहे. (सगळेच काँग्रेसजन एकजात असे आहेत असे माझे म्हणणे नाही. ज्यांचे काँग्रेस सदस्यत्व हिरावून घेण्यात आले, तशी काही तेजस्वी माणसे काँग्रेसमध्येही अद्याप आहेत. एकाधिकारशाहीच्या स्वभावाप्रमाणे अशा तेजस्वी माणसांनाही पक्षातदेखील टीकेचा शब्द उच्चारण्याचे स्वातंत्र्य नसते.) कागदोपत्री आणि प्रचाराच्या धूमधडाक्याने बरेच काही होत असल्याची हवा निर्माण करता येईल; पण प्रत्यक्ष पदरात मात्र काहीच पडणार नाही. देशभर सर्वत्र पसरलेल्या बहुसंख्य गरीब दुबळ्यांची स्थिती गेल्या काही वर्षांत आणखीनच खालावली आहे. ही घसरगुंडी थांबवता आली तरी मोठी बहादुरी केली असे म्हणावे लागेल. पण ते करायचे, तरी तुमचे राजकीय आणि आर्थिक धोरण बदलण्यावाचून गत्यंतर नाही.

हे सर्व मी रोखठोकपणे मांडले आहे. उगा शब्दांचे बुडबुडे उडवण्यात मला स्वारस्य नाही. रागावून मी हे सांगितलेले नाही. शब्दाशब्दी मला करायची नाही. तसे करणे म्हणजे आपले कर्तव्य संपुष्टात आले आहे, अशी कबुली देण्यासारखेच आहे. माझ्यासारख्यांच्या स्वास्थ्य आणि सोयीची सरकारने जी काळजी वाहिली त्याबद्दल मी आभारी आहे; पण तरी सत्य ते मला सांगितलेच पाहिजे आणि नेमके तेच दडवण्याचा आणि विकृत करण्याचा तुमचा खटाटोप चाललेला आहे.

कर्तव्य हे नेहमी कठोर असते आणि म्हणूनच मला कडक शब्दांत सत्य सांगावे लागले आहे. आणखी चार हिताच्या गोष्टी सांगून मी पत्र संपवणार आहे. एक तर मी



आता वृद्ध झालो आहे. माझे जीवितकार्य मी पार पाडले, अशी कृतार्थ भावना माझी आहे. प्रभावतीच्या निधनानंतर कोणासाठी जीव जगवावा असे काही जीवनात आता उरलेले नाही. माझा भाऊ आणि पुतणे यांची कुटुंबे आहेत. माझी वडील बहीण तर कधीच निरोप घेऊन गेली. धाकटी बहीण आणि तिची मुलेबाळे आहेत, नाहीत असे नाही. पण शिक्षण संपवल्यानंतर माझे जीवन देशासाठी, लोकांसाठी समर्पण केले. त्या बदल्यात कोणत्याही प्रकारची अभिलाषा मी कधी धरली नाही. तेव्हा तुमच्या राजवटीत तुरुंगात मला मृत्यू आला तरी त्यात मी समाधान मानीन. अशा माणसाचे चार उपदेशाचे शब्द तुम्ही ऐकावेत असे मला वाटते. आपल्या राष्ट्रनिर्मात्यांनी (त्यांच्या मालिकेत तुमच्या थोर वडिलांचाही अंतर्भाव आहे) जो पाया घातला तो उद्ध्वस्त करू नका. तुम्ही जो रस्ता चोखाळला आहे, त्यावर चालताना लोकांच्या वाट्याला छळ आणि कष्टच काय ते येतील. तुमच्या वाट्याला केवढा वैभवशाली वारसा आला आहे, त्याचे विस्मरण होऊ देऊ नका. केवढी महान मूल्ये आपल्याला त्या थोर पुरुषांनी दिली! एक व्यवहार्य लोकशाही त्यांनी आपल्यासाठी मागे ठेवली आहे. हे सर्व उद्ध्वस्त झालेले पुढच्या पिढ्यांच्या वाट्याला आणू नका. पुन्हा ते तुकडे एकत्र करण्याला फार काळ लागेल. ते पुन्हा एकत्र केले जाईल, या बाबतीत मात्र मी निःशंक आहे. ज्यांनी इंग्रजांसारख्या जबरदस्त साम्राज्यसत्तांना खडे चारले, ते एकाधिकारशाहीची लाजिरवाणी राजवट कायमची डोक्यावर बसवून घेतील हे कदापि शक्य नाही. मानवी स्वातंत्र्याकांक्षा कधीही नष्ट होणार नाही; तिला कितीही खोल दडपण्यात आले तरी ते शक्य नाही. स्वतःची एकाधिकारशाही जमवण्यासाठी तुम्ही त्या स्वातंत्र्याकांक्षेला खोलवर दफनवण्याची कोशिश केली आहे; पण थडग्यातूनही ती उफाळून वर आल्यावाचून राहणार नाही. रशियात देखील हळूहळू ती वर येताना दिसत आहे.

सामाजिक लोकशाहीबद्दल तुम्ही बोलत सुटला आहात. त्या शब्दांबरोबर केवढी रम्य स्वप्ने मनापुढे तरळतात! पण प्रत्यक्षात पूर्व आणि मध्य युरोपात तिचा चेहरा किती विकृत आणि विद्रूप आहे ते आपण पाहिलेच आहे. नागडी एकाधिकारशाही तिथे नंगा नाच घालीत आहे आणि शेवटी रशियाची मांडलिकीच त्यांच्या वाट्याला आली आहे. कृपा करा आणि भारताला त्या भीषण अवस्थेकडे लोटू नका.

आणि हा सगळा दहशतवाद व दांडगाई कशासाठी? वीस कलमी कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी? पण तो दहा कलमी कार्यक्रम अमलात आणताना तरी तुमचे हात कोणी धरले होते? स्वतःचाच कार्यक्रम अमलात आणण्याबाबत तुम्ही जी अक्षम्य हेळसांड चालवली होती, त्यामुळेच तर लोक क्षुब्ध झाले होते; निषेध करत होते; सत्याग्रह करत होते. तरुण आणि जनता यांचा छळवाद थांबवण्याच्या दृष्टीने कार्यक्रम अपुरा होता. चंद्रशेखर, मोहन धारिया, कृष्णकांत आणि त्यांचे इतर मित्र हेच सांगत होते आणि त्याबद्दल तुम्ही त्यांना खुशाल शासन केले आहे.

देश वाहवत चालल्याचा गवगवा तुम्ही चालवला आहे. पण त्याला काय मी जबाबदार होतो, की विरोधी पक्ष जबाबदार होते? तुमच्यातलीच निर्णयाबाबतची द्विधावृत्ती त्याला कारणीभूत आहे. ना निश्चित दिशा, ना अमलबजावणीसाठी उठावणी तुम्ही केली. तुमचे स्वतःचे आसन धोक्यात आले म्हणजे मग तुमच्यातली तत्परता जागी होते आणि नाट्यपूर्ण निर्णय तुम्ही करता. एकदा आसन सुरक्षित झाले की तुमचे वाहवत जाणे पुनरपी सुरू होते. इंदिराजी, कृपा करा आणि स्वतःला राष्ट्र समजू नका. तुम्ही काही अमरपट्टा घेऊन आला नाहीत. भारत मात्र यावच्चंद्रदिवाकर अस्तित्वात राहणार आहे.

मी आणि विरोधी पक्षीय मंडळी म्हणजे कोणी सैतान आहोत, असे भासवण्याची तुमची खटपट आहे; पण तुम्ही जर विहित गोष्टी करायचे ठरवले, आणि विरोधकांना त्यासाठी विश्वासात घेतले, तर आमच्यापैकी प्रत्येकाचे उत्स्फूर्त सहकार्य तुम्हाला मिळू शकेल. मंत्रिपातळीपासूनचा भ्रष्टाचार उखडून काढायचे ठरवा. निवडणूक पद्धतीत सुधारणा करा, तुमचा वीस कलमी कार्यक्रम अमलात आणायचा निर्धार केलात तरी हरकत नाही. विरोधकही तुमच्याशी सहकार्य करतील. त्यासाठी लोकशाही निकालात काढण्याची गरज नाही. आता डाव तुमच्यावर आलेला आहे, त्यामुळे तुम्हीच काय तो निर्णय केला पाहिजे.

या अखेरच्या शब्दांनी मला तुमचा निरोप घेऊ द्या. परमेश्वर तुम्हांला सद्बुद्धी देवो.

तुमचा

**जयप्रकाश**

(२१ जुलै १९७५ रोजी तुरुंगातून जयप्रकाशांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना लिहिलेल्या पत्राचा मराठी तर्जुमा, साधनाच्या २४ जानेवारी १९७६ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता.)

# दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धातील 'साधना'चा लढा

## सदानंद वर्दे



'साधना'चे अकरा अंक एका मागोमाग एक आक्षेपार्ह ठरले तरी 'साधना'ने आपला बाणा सोडला नाही. तेव्हा न्यायालयात न जाता सजा करण्यासाठी सरकारने पंधरा दिवसांच्या आत हजार रुपयांचा जामीन भरण्याचा हुकूम काढला! एका मित्राने सुचविले, एक एक रुपयाप्रमाणे आपल्या चाहत्यांनाच जामिनासाठी पैसे मागावे. सरकार 'साधना'ला शासन करायला निघाले होते. पण 'साधना'च्या मागे अशा दडपशाहीच्या वातावरणातही हजार लोक आहेत, हे दाखवण्याची ही संधी नामी होती. सरकारने जामिनाची बातमीही वृत्तपत्रांत येऊ दिली नव्हती! 'साधना'त ती छापली आणि लोकांची विनवणी केली. आश्चर्य म्हणजे प्रचंड भीतीने लोक ग्रासले आहेत, असे वातावरण असताना लोकांच्या मनात धगधगता स्वातंत्र्यस्फुल्लिंग अद्याप आहे याचा पुरावाच मिळाला!

२६ जून १९७५ रोजी भारतात आणीबाणी लागू झाली. वृत्तपत्रांवर प्रसिद्धीपूर्व तपासणी सक्तीची केली गेली. 'साधना'कडे अर्थातच पोलिसांचा फेरा आला. 'तुमचे काय ठरले?', असे त्यांनी विचारले. 'साधनाचे विश्वस्त निर्णय घेतील तेव्हा काय ते ठरेल' यदुनाथजी म्हणाले. पोलीस परत गेले! त्यानंतर त्यांचा पुन्हा फेरा आला. 'चोवीस तासांत तुमचा मजकूर तपासून मिळेल. मजकूर पोलीस कमिशनरांच्या कार्यालयात पाठवून द्या.' 'तपासून घ्यायचे ठरले म्हणजे पाठवू', असे सांगून त्यांना वाटेला लावले. साधना विश्वस्तांची सभा झाली. एस. एम. जोशी पाटण्याहून निघून आणि दोन ठिकाणी मुक्काम करून पुण्याला येऊन पोचले होते. त्यामुळे परिस्थितीची स्पष्ट कल्पना आली. जयप्रकाश दोन वर्षांपासून जो इशारा देत होते तो खरा ठरला होता. हुकूमशाही चोरपावलांनी आणि लोकशाहीचे बेमालूम सोंग वठवीत देशात शिरू पाहात होती. माजी राष्ट्रपती गिरी यांचे एक पूर्वप्रसिद्ध पत्र छापायला सेन्सॉरने बंदी घातली होती. एका प्रसिद्ध लेखकाची 'भूक' नावाची गोष्ट नामंजूर झाली होती. 'सध्या भूक वगैरे काही नाही. प्रत्यक्षात असली तरी ती वृत्तपत्रांतून उमटता कामा नये!' त्याने दम दिला होता. संपादकाने त्या भुकेचा-गोष्टीतील भुकेचा खऱ्या भुकेशी काही संबंध नाही, हे सांगण्याचा परोपरीने प्रयत्न केला, पण व्यर्थ! त्याच्या सत्तेपुढे हे सर्व शहाणपण निरुपयोगी ठरले होते! एका वृत्तपत्रात शासकीय अनुमतीने प्रसिद्ध झालेला लेख दुसऱ्या वृत्तपत्राला छापायला बंदी! नेत्यांची जुनी अवतरणे छापायला बंदी!! पारतंत्र्याच्या काळातही कधी नव्हती एवढी जाचक बंधने स्वातंत्र्यात?

मराठी पत्रकारांना टिळक-आगरकरांच्या निर्भय पत्रकारितेचा केवढा जाज्वल्य अभिमान! खरे म्हणजे केसरीनेच पत्रस्वातंत्र्याच्या लढ्याचे नेतृत्व करायचे; पण तसे झाले नाही. इतर पत्रांचेही तेच झाले होते.

साधना विश्वस्तांनी स्वत:लाच प्रश्न विचारला, 'आपण विश्वस्त कशाचे? मालमत्तेचे की ध्येयवादाचे?' आणि विश्वस्तांचा एकमताचा निर्णय होता, आपण ध्येयवादाचे विश्वस्त आहोत! मालमत्ता हे त्या ध्येयवादाचे फक्त साधन आहे. तेव्हा साने गुरुजींनी जो अखेरचा संदेश दिला तो ध्यानी ठेवून 'साधना'ने नेटाने आपली भूमिका अदा करावी.

साने गुरुजींनी लिहिले होते. 'लोकशाही समाजवाद हे ध्येय धरा. ते तारील. भारतात रक्तपात न होता समाजवाद

येवो. व्यक्तिस्वातंत्र्यासह समाजवाद फुलो.' आणि इथे तर शासनाची सर्व पावले याच्या विपरीत पडत होती आणि त्यावर टीका करणे क्रमप्राप्तच होते!

या धोरणाने 'साधना'ची आहुती पडण्याची शक्यता दर क्षणी होती; पण ध्येयवादासाठी मालमत्तेची राखरांगोळी झाली, तर त्यात वावगे काहीच नव्हते! राखेतून फिनिक्स पक्षी जसा पुन्हा जन्म घेतो तशी लोकशक्तीच्या बळावर 'साधना' उभी राहील, असा आत्मविश्वास विश्वस्तांत होता.

'साधना'चा जन्मच मुळी लोकांच्या आधारावर झाला. 'साधना'च्या सर्व अडचणींच्या प्रसंगी लोकच तिच्या पाठीशी उभे राहिले. 'साधना' मुंबईहून पुण्याला आणावी लागली तेव्हा लोकांनीच मदतीचा हात दिला होता. पानशेतच्या पुरात 'साधना'वर जी भीषण आपत्ती आली, तेव्हाही मदतीसाठी जनताच तर धावून आली. मग जनतेबद्दल अविश्वास कशासाठी? 'जन तोच जनार्दन' हीच तर 'साधना'ची निष्ठा राहिली. प्रभूचे हेच हजार आधार गोवर्धन उचलायला उभे राहतात. विश्वस्तांनी 'साधना' आहे त्या स्वरूपात चालवायची असा निर्णय घेतला. निर्भय, निर्वैर, निष्पक्ष असा आपला बाणा 'साधना'ने सोडायचा नाही. उद्दामही व्हायचे नाही आणि लाचार होऊन लोटांगणही घालायचे नाही. त्याचे जे परिणाम होतील, त्यांना सत्याग्रही बाण्याने तोंड द्यायचे असे ठरले. याचा अर्थ पहिला अंकही शेवटचा अंक ठरू शकतो, असा होत होता!

त्याच वेळी बेचाळीसच्या क्रांतीतील एक अग्रणी श्री.अच्युतराव पटवर्धन पुण्यात होते. त्यांना सर्वजण भेटायला गेले. त्यांच्याशी विचारविनिमय केला. त्यांनी सांगितले, 'जे घडले आहे त्याचा प्रतिकार केला पाहिजे; पण सौम्यतम पातळीवर सुरू करा. नंतर सौम्यतर करा. मग सौम्य करा आणि मग प्रखर करा. पण आपला निषेध आपण नोंदवलाच पाहिजे.'

हा लढा बराच काळ आणि नेटाने चालवावा लागणार आहे, याची जाणीव त्यांनी करून दिली आणि लोकांना भयमुक्त करणे हे पहिले पाऊल आहे, हेही त्यांनी सांगितले. 'साधना'चा मार्ग स्पष्ट झाला. सेन्सॉरला न जुमानता 'साधना' प्रकाशित करायची हे ठरले. पण भडकपणा न करता हे करायचे होते.

तेव्हा पहिला अंक फक्त चार पानांचा काढायचा असे ठरले. पहिल्या पानावर निषेध दर्शक काळा ब्लॉक, आतल्या बाजूला ठसठशीत अक्षरात साने गुरुजींचा अखेरचा संदेश आणि त्यांचे एक रेखाचित्र आणि शेवटच्या पानावर इतर मजकूर असलेला हा अंक प्रकाशित झाला! सर्वत्र रवाना झाला. इतका सौम्यतम निषेधदेखील अन्य फारसा वृत्तपत्रांनी केलेला नव्हता.

अंक रवाना झाला, ग्राहकांपर्यंत पोहोचला. त्यांच्या मनोभावना 'साधना'त उमटल्या, असेच त्यांना वाटले.

त्यानंतरच्या अंकाची रचना अशीच. पण अंकाची पाने आठ केली. दुसऱ्या पानावर विनोबांचे एक अवतरण दिले. १९६३ च्या जुलै महिन्यात बंगालमध्ये विनोबांनी केलेल्या ह्या प्रवचनात विनोबांनी म्हटले होते, 'शिस्तीचे लगाम लावून तोंडे बंद करण्यात लोकशाही नसून प्रत्येकाने आपल्या मनातली बात मोकळेपणाने बोलण्यात लोकशाही आहे. शिस्तीच्या नावाखाली मुस्कटदाबी होऊ लागली तर पाहता पाहता लोकशाहीचे रूपांतर एकतंत्री राज्यात होईल. त्यातून पुढे लष्करशाहीचाही अवतार होईल. लोकमताची अशी पायमल्ली होत राहिली की हाती राहते फक्त सैन्य... एका बाजूला तोंडाळ विरोधी पक्ष आणि दुसऱ्या बाजूला शिस्तीच्या नावाखाली तोंड शिवलेला सत्ताधारी पक्ष. अशी स्थिती झाली तर लोकांचा कोणावरच विश्वास राहणार नाही. ते मते देतील; पण त्यांचे सहकार्य मिळणार नाही आणि लोकांचे सहकार्य नसेल तर देश आपल्या पायावर उभा कसा राहील? ज्या पक्षाच्या हाती सत्ता आहे, त्या पक्षाच्या लोकांनीही सत्य-प्रिय बोलावे. पण मनात असूनही जर ते शिस्तीच्या नावाखाली बोलणार नसतील, तर त्यातून देशाचे भले होणार नाही!'

विनोबांचे 'साधना'च्या जुन्या अंकातील वचन उद्धृत करण्यात फार मोठे रहस्य होते. पहिली गोष्ट म्हणजे 'अनुशासन पर्व' अशी आणीबाणीची भलावण करणाऱ्या विनोबांना त्यातून एक संकेत मिळत होता आणि आत्मसमर्थनार्थ विनोबांच्या वचनांचा उदोउदो करणाऱ्या काँग्रेसजनांनाही त्यात एक इशारा होता. याच अंकात अच्युतराव पटवर्धनांशी झालेली बातचीतही दिली होती.

सेन्सॉरबोर्डाने अत्यंत काळजीपूर्वक 'साधना'चा अभ्यास करून पाहिला. चार पानांचा अंक आक्षेपार्ह मजकुराचा म्हणून पंधरवड्याने जाहीर केला! इतरांना दहशत घालण्याचा त्यांचा उद्देश होता. पण दहशत बसलेल्यांना आणखी दहशत घालणे निरुपयोगी होते. अर्थात, स्वातंत्र्यवाद्यांना मात्र अंकाबद्दल उत्सुकता निर्माण झाली. आणि सरकारी छावणीतही ही मंडळी होती. लोक चोरून

छपून 'साधना' प्रसृत करू लागले. 'साधना' वाचल्याने आपण आपली स्वातंत्र्याकांक्षा निर्भयपणे जतन करतो असा अनुभव त्यांना येऊ लागला. तुरुंगात 'साधना'ची वाट मंडळी पाहू लागली. इतर प्रदेशांत भाषेच्या भिंती ओलांडून 'साधना' जाऊ लागली. तिचे सामुदायिक वाचन होऊ लागले!

दर पंधरवड्याने अंक आक्षेपार्ह म्हणून जाहीर करण्याचा सपाटा सरकारने सुरू केला. अंकातले नेमके आक्षेपार्ह काय, ते त्यांना सांगता येईना आणि अंक तसाच लोकांना प्रसृत होऊ देणे परवडेना. अंकात काय आक्षेपार्ह आहे ते ठरविण्याचा वकूब सरकारमध्ये नव्हता.

सर्वोच्च न्यायालयात काही लिखाणाबाबत दाद मागितली होती आणि त्यात सरकारला आपली बाजू सावरता आली नव्हती. त्यामुळे अंक आक्षेपार्ह ठरवण्याचा उद्योगच सरकार करीत होते, सरकारचा असला निर्णय कोण करते ते मंत्र्यांनाही अवगत नव्हते. एक मंत्री खासगीत म्हणाले देखील, 'तुमच्या अंकात आक्षेपार्ह काय आहे, तेच समजत नाही. सरकारी धोरण चुकीचे वाटले तर ते तसे आहे असे म्हणणे हा लोकांना अधिकारच आहे'; पण आणीबाणीच्या नावाखाली इतके अफाट अधिकार नोकरशाहीने बळकावले होते, की भल्या भल्या मंत्र्यांनाही त्यांच्यापुढे हतबल झाल्यासारखे वाटत होते.

सरकारने अंक आक्षेपार्ह म्हणून जाहीर करावे आणि लोकांनी ते वाटेल त्या खटपटी करून मिळवून वाचावे व त्याची दाद द्यावी, असे सुरू झाले. कुठल्याही स्वातंत्र्यप्रेमी समाजात हेच घडत असते. सरकारला आक्षेपार्ह वाटणारे साहित्य हर खटपट करून मिळवून वाचणे आणि इतरांना वाचायला देणे हा सुद्धा एक अभिमानाचा विषय ठरत असे. 'साधना'ला ते महत्त्व चढले.

आणीबाणी लागू झाली तेव्हा नानासाहेब गोरे अमेरिकेत गेले होते. तेथून ते परत आले आणि दिल्लीत त्यांनी एक फेरी केली. परतल्यावर यदुनाथजींनी त्यांच्याशी बातचीत केली, 'आणीबाणी आपल्यासाठी नाहीच, असे समजून चालावे.' असे त्यांनी सांगितले आणि त्याच बाण्याने ते वागत होते. तेव्हा ९ ऑगस्ट क्रांतिदिनाला 'साधना'च्या आंतरभारती सभागृहात त्यांनी भाषण देण्याचे मान्य केले. साधनाच्या रस्त्यावरील फलकावर ते स्वच्छ लिहिले. वृत्तपत्रांच्या स्थानिक कार्यक्रमाच्या सदरात 'क्रांतिदिनानिमित्त 'साधना'च्या वाचकांची सभा– मुख्य वक्ते – नानासाहेब गोरे' असे प्रसिद्ध केले. साधनाचे 'ग्राहक' न म्हणता 'वाचक' म्हटले होते. कारण ग्राहक नसणारादेखील वाचक असू शकतो!

साधनाच्या समोरच पोलीस चौकी आहे. २६ जूननंतर भरणारी ही पुण्यातली पहिलीच सभा होती. परिणाम काहीही होऊ शकत होता. सर्व सभेलाच अटक होऊ शकत होती. काही मंडळींनी येऊन विचारलेदेखील, 'बैठकीला पोलीस आले तर?' त्यांना सांगितले, 'ते वाचक असतील तर तेही येऊ शकतात.' आणि आश्चर्य म्हणजे आंतरभारती सभागृह श्रोत्यांनी ओसंडले. प्रास्ताविक यदुनाथजींनी केले आणि नानासाहेब त्यांच्या नेहमीच्याच परखड शब्दांत बोलले. अत्यंत श्रवणीय आणि आत्म्याला हाक देणारे ते विवेचन होते. वातावरणात दाटलेल्या भीतीच्या भीषण काळ्याकुट्ट वलयाला त्यामुळे चीर पडली. नानासाहेबांच्या त्या


साधना

हिंदुस्थान हा एक मोठा तुरुंग आहे!

– महात्मा गांधी

भाषणाला धरून त्यानंतरच्या 'साधना'त त्यांची एक मुलाखत छापली. तेजस्वी मुलाखत! तिच्यात एका प्रश्नाच्या उत्तरी नानासाहेब म्हणाले होते, 'वृत्तपत्रांवर आजची राक्षसी बंधने आहेत, तशी इंग्रजांनी घातली असती तर महात्मा फुले आपला आसूड फटकारू शकले नसते. 'केसरी'कार टिळक लोकमान्य पदवीला पोचले नसते. 'हरिजन' वाचून गांधी महात्मा गांधी आणि 'नॅशनल हेराल्ड' वाचून नेहरू, नेहरू होऊ शकले असते काय?' आणीबाणीबद्दलचे विवेचन नेमके होते. अर्थात हा अंकही पुढे आक्षेपार्ह ठरला.

'साधना'चा प्रत्येक अंक शेवटचाच ठरण्याचा संभव आहे, हे ओळखून तो अत्यंत कसोशीने काढण्याची धडपड होती आणि पहिले गांगरलेपण जाऊन सरकारच्या यंत्रणेवर मात करील आणि वार्ता मिळवील अशी यंत्रणा हळूहळू तयार होत आली. सरकारी गोटातल्या हालचालींचा देखील पत्ता लागू लागला. 'साधना'तले बातचीत हे सदर म्हणजे माहिती व विचार यांचा कोशच बनला. एक चढ एक मुलाखती त्यात येऊ लागल्या. लोकसभेतील वृत्तांताच्या प्रकाशनावर चीफ सेन्सॉरने बंदी घातली, इतका उन्मत्तपणा त्यांचा वाढला होता. पण खासदार लोकसभेत काय बोलले ते मोठ्या खुबीने बातचीत म्हणून यदुनाथजी त्यांच्याकडून वदवून घेत होते. आणि 'साधना'त देत होते. खासदार पुरुषोत्तम मावळंकर, कविवर्य उमाशंकर जोशी, खासदार कृष्णकांत, छगला, इरा चेळीयन अशा एकाहून एक वरचढ मुलाखती बातचीत म्हणून 'साधना'त येऊ लागल्या आणि इंदिराबाईंनी उभा केलेला संसदेभोवतीचा पडदाही साधनाने चिंध्या करून टाकला.

एव्हाना तुरुंगातील मंडळींशीही समयोग स्थापित झाला आणि गजांपलीकडूनची माहिती 'साधना'त येऊ लागली. मधू लिमये, मधु दंडवते, हरिभाऊ कामत आणि इतरही कित्येकांची माहिती हाती येऊ लागली. इतरांची पत्रेही हाती येऊ लागली. 'गजांपलीकडून' सदरातून येणारी माहिती फार हृदयस्पर्शी असे.

'साधना'बाबत सरकारने हाच खाक्या अवलंबला. 'साधना'चे अकरा अंक एका मागोमाग एक आक्षेपार्ह ठरले तरी 'साधना'ने आपला बाणा सोडला नाही. तेव्हा न्यायालयात न जाता सजा करण्यासाठी सरकारने पंधरा दिवसांच्या आत हजार रुपयांचा जामीन भरण्याचा हुकूम काढला! एका मित्राने सुचविले, एक एक रुपयाप्रमाणे आपल्या चाहत्यांनाच जामिनासाठी पैसे मागावे. सरकार 'साधना'ला शासन करायला निघाले होते. पण 'साधना'च्या मागे अशा दडपशाहीच्या वातावरणातही हजार लोक आहेत, हे दाखवण्याची ही संधी नामी होती. सरकारने जामिनाची बातमीही वृत्तपत्रांत येऊ दिली नव्हती! 'साधना'त ती छापली आणि लोकांची विनवणी केली. आश्चर्य म्हणजे प्रचंड भीतीने लोक ग्रासले आहेत, असे वातावरण असताना लोकांच्या मनात धगधगता स्वातंत्र्यस्फुल्लिंग अद्याप आहे याचा पुरावाच मिळाला! महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून तीस पैसे पोस्टेज खर्च करून लोकांनी शंभर-शंभर पैशांच्या मनिऑर्डरी केल्या! दिसायला लहान पण ही फार मोठी घटना होती. असे चार हजार रुपये लोकांनी पाठविले. भीतीचा पडदा टराटरा फाटल्यासारखा झाला. आश्चर्य म्हणजे सेन्सॉर ऑफिसात काम करणाऱ्या दहा लोकांनीही आपला एक एक रुपया जामिनासाठी पाठवला!

'खरे खोटे राम जाणे' हे एक नवे सदर याच वेळी 'साधना'त सुरू झाले. सरकारी प्रचार यंत्रणेचा मुकाबला करू शकेल अशी प्रतिस्पर्धी आणि कार्यक्षम समनुयोग यंत्रणा एव्हाना उभी झाली होती आणि सरकारपेक्षाही अधिक गतीने खबरा 'साधना'कडे पोहोचू लागल्या होत्या.

'साधना'चे क्रमाने अकरा अंक आक्षेपार्ह ठरले. हजार रुपयांचा जामीन मागून तो जप्त करण्यात आला. 'शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये' हा पायंडा सोडून 'साधना' बौद्धिक आघाडी लढवण्यासाठी कोर्टात गेली.

आक्षेपार्ह अंक हातोहात वितरित होऊन चुकले होते. कोर्टात पुराव्यादाखल त्याच्या अठरा-अठरा प्रती द्यायच्या होत्या. त्या मिळवता मिळवता नाकीनऊ आले. दावा दाखल झाला तेव्हा वकिलांजवळ पुरेशा प्रती नव्हत्या. न्यायमूर्तींनी त्या प्रतींची चौकशी केली. वकील म्हणाले, 'तुमच्या घरी पाठवून देतो.' न्यायमूर्ती म्हणाले, 'घरी पाठवू नका. त्या पुरावा म्हणून दाखल करा, म्हणजे मला त्या कायदेशीरपणे वाचता येतील!'

मॅटर सबज्युडीस म्हणजे न्यायालयाधीन झाली तेव्हा अधिकच निर्भयपणे अंकातील मजकुराची जुळवाजुळव करू लागलो. सरकार केव्हाही अंक बंद पाडील हे उघडच होते. मग नवे वृत्तपत्र काढायचा विचार सुरू झाला. मधु वाणी हे कामगार क्षेत्रातले एक कार्यकर्ते. त्यांच्या नावाने प्रेस रजिस्ट्रारकडे अर्ज पाठविला. साने गुरुजी पूर्वी 'कर्तव्य' नावाचे सायंदैनिक चालवीत असत. त्याच नावाने हिंदी-मराठी नियतकालिक काढायचा संकल्प केला आणि परवानगीसाठी पत्र गेले. 'कर्तव्य',

'नवकर्तव्य', 'लोकशाही कर्तव्य' अशा नावांना अनुमती मागितली. लता कामत नावाच्या, बिहारमध्ये जयप्रकाशांच्या चळवळीत असणाऱ्या एका भगिनीच्या नावाने एक पत्र गेले. श्री.जवाहर कोटेचा यांनी 'उज्ज्वल उद्यासाठी' नावाची परवानगी मागितली. पोलीस चौकशीत अर्थातच उगमस्थानांचा संशय आला आणि धडाधड नकार येऊ लागले.

'साधना'चे अंक धडाकेबाजपणे सुरू होते. आता पहिल्या पानावर कविता येऊ लागल्या. वसंत बापटांच्या ह्या कविता मर्मावर प्रहार करणाऱ्या होत्या. अखेर दिवाळी आली. 'साधना'चे दिवाळी अंक नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण असतात. या अंकात 'फॅसिझम' वर एक विभाग होता. फॅसिस्टच फॅसिझमविरोधी परिषदा घेऊ लागले होते. त्यांचा पडदा टरकावणे भाग होते. प्रा.नरहर कुरुंदकरांनी अतिशय मार्मिक दीर्घ लेख लिहिला. इतरही चांगले लेख जमले. अंकाची छपाई सुरू असतानाच मुंबईहून सांकेतिक संदेश येऊ लागले की, सरकार 'साधना'वर घाला घालणार. त्यात अनपेक्षित काहीच नव्हते. पण एवढ्या मेहनतीने तयार केलेला दिवाळी अंक तरी लोकांना पोचायलाच हवा होता. तेव्हा शक्य तेवढी चपळाई करून दिवाळी अंक पोस्टात टाकला गेला आणि 'साधना'ला आठवडाभराची सुट्टी देऊन टाकली गेली. नंतर सरकारी धाड आली. सरकारने हुशारीने सर्व डाव रचला होता. हायकोर्टाला सुट्टी असताना एकदा प्रेसला टाळे ठोकले, की ते सुखासुखी उघडता येणार नाही आणि आपोआपच साप्ताहिक 'साधना' बंद पडेल असा होरा!

दुसऱ्या दिवशी मुंबईच्या उच्च न्यायालयात श्री.सी.आर. दळवी यांनी स्टेचा अर्ज व्हेकेशन जजपुढे दिला. त्याची त्यांनी लगेच विल्हेवाट लावली. 'साधना' प्रेसला सरकारने टाळे लावू नये. कारण साठ-सत्तर लोकांच्या उपजीविकेचा प्रश्न आहे आणि 'साधना' प्रेसने 'साधना' साप्ताहिकाची छपाई आक्षेपार्ह असल्याने करू नये असा निर्बंध घातला. वाजवी असा निर्णय होता. सरकार मनात मांडे खात बसले की, 'साधना' साप्ताहिक काही आता निघू शकणार नाही! सरकारची कल्पना अशी की हे विकतचे श्राद्ध घेतो कोण? पण समाजवादी मित्रच जनवाणी प्रेस चालवतात. त्यांनी हे संकट पत्करायची सिद्धता केली. झटकन नवे डिक्लरेशन केले गेले आणि अंक तसाच सुरू ठेवला. मध्यंतरीच्या काळात गंभीर आजारापायी जयप्रकाशांची सुटका झाली. त्यांना जसलोक रुग्णालयात आणले.

डायलेसिस, म्हणजे यंत्राच्या साह्याने रक्तशुद्धीकरण करून जयप्रकाश सावरतील असा आत्मविश्वास डॉक्टरांना आला. लाखभर रुपये त्यासाठी लागणार होते. जयप्रकाशांच्या जिवासाठी एवढे पैसे चारदोन मंडळीही उभे करू शकली असती! पण रुपरुपाया करून हे पैसे जमवावे असे ठरले. दादा धर्माधिकारी, रविशंकर महाराज, केदारनाथजी यांच्या सहीने अपील काढायचे ठरले. पण हे पत्रक छापणार कोण आणि निधी गोळा करणार कोण? 'साधना'ने ही जबाबदारी घ्यायचे ठरवले. उघडपणे हे सर्व करायचे होते. रुपयाच्यावर कोणाकडूनही अधिक रक्कम घ्यायची नव्हती. सरकारच्या अमानुष प्रचाराला हे सक्रिय उत्तर ठरणार होते.

'साधना'ने रुपरुपयाची कुपने छापली. साधनात एकएक रुपयाची कुपने घेण्यासाठी 'साधना'च्या प्रजासत्ताकदिन अंकात आजारी जयप्रकाशांच्या रंगीत चित्रासह एसेमच्या सहीचे एक पत्रक छापले. 'जयप्रकाशांसाठी रुपयाप्रमाणे एक लाख' ह्या सूचनेचा जादूसारखा प्रभाव पडला. त्या वेळी जयप्रकाशांची ती सुंदर कविता एसेम जोशींकडून हाती आली होती. 'साधना'ने ती छापली. जयप्रकाशांची सारी थोरवी त्या एका कवितेत प्रकट झालेली आहे. मूळ कविता हिंदीत आहे. जयप्रकाशांची ती 'हृदयस्पर्शी कविता' वाचून ज्याचे डोळे पाणावले नसतील असा सहृदय माणूस विरळा.

*जीवन विफलताओंसे भरा हैं*
*सफलताएँ जब कभी आयी निकट*
*दूर ठेला हैं उन्हें निज मार्गसे*
*तो क्या वह मूर्खता थी? नहीं...*
*सफलता और विफलताकी*
*परिभाषाएँ भिन्न हैं मेरी*
*मुझे क्रांति शोध के लिये*
*कुछ अन्यही पथ मान्य थे, उद्दिष्ट थे।*
*पथ त्याग के, सेवा के, निर्माण के*
*पथ संघर्ष के, संपूर्ण क्रांति के*
*जग जिसे कहता विफलता थी।*
*थी शोधकी वे मंजिले*
*मंजिले वे अनगिनत है*
*गंतव्य भी अति दूर हैं*
*रुकना नही मुझको कही*
*अवरुद्ध कितना मार्ग हो।*
*निज कामना कुछ है नही*
*सब हैं समर्पित ईशको*
*विफलताओं पर तुष्ट हूँ अपनी*

*और यह विफल जीवन*
*शतशत धन्य होगा यदि*
*समानधर्मा प्रिय तरुणों का*
*कंटककीर्ण मार्ग यह*
*कुछ सुगम बन जाये।*

वर्षभर राजबंदी तुरुंगात राहिले. लोक आपापल्यापरी काही तरी मदतीची धडपड करीतच होते. पण उघडपणेच हे का करू नये? 'साधना'नेच या कामी निर्भयपणे पुढाकार घ्यावा, असे यदुनाथांच्या मनात आले. अशा सर्व कामांत एस.एम. जोशींचा सदैवच पाठिंबा असे. आचार्य दादा धर्माधिकारी यांच्याशी बोलणे झाले. त्यांच्याकडून एक पत्रक तयार करून घेतले. दादांचे सारे सौजन्य आणि सहृदयता त्या पत्रात एकवटली होती. राजबंद्यांच्या परिवारांचा छळवाद का, असा सरळ प्रश्न होता. दादांच्या जोडीने केदारनाथजी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, आचार्य वि.प्र. लिमये, गोविंदराव शिंदे, एस.एम. जोशी यांच्या सह्यांनी ते पत्रक प्रसिद्ध झाले. सर्व मराठी पत्रांकडे ते पाठवले. छापण्याची हिंमत कोणीच दाखविली नाही. 'साधना'ने पावत्या छापल्या. सर्वत्र प्रसृत केल्या. 'साधना'च्या फळ्यावर जाहीर रीतीने लिहिले गेले. पैसे जमा होऊ लागले आणि राजबंदी परिवारांच्या होणाऱ्या छळवादाची पत्रेही येऊ लागली.

'साधना'वर सरकारने आघात केला, तरी लोकजागृतीचे काम बंद पडता कामा नये म्हणून एका बाजूला सहचिंतन सभांची प्रणाली 'साधना'ने सुरू केली; दुसऱ्या बाजूला 'जनबोध प्रकाशन' म्हणून एक माला सुरू करण्याचीही आखणी केली.

मृणाल गोरे यांना भूमिगत अवस्थेतच सरकारने अटक केली. त्यांना अकोल्याच्या तुरुंगात डांबण्यात आले. त्यांचा छळवाद मांडण्यात आला. महारोगी आणि वेडी यांच्या शेजाराला त्यांना ठेवले. प्रभुभाई संघवी व त्यांच्या मित्रांनी अकोल्याला जाऊन ही सर्व हकीकत आणली. मृणालताईंची ह्या काळातली डायरीही हातात आली. त्याची तपशीलवार हकीकत 'साधना'ने दिली. तेव्हा सर्वत्र क्षोभाची आणि संतापाची एक लाट उसळली! दुर्गाताई भागवतांची तेजस्वी भाषणे मिळवून 'साधना'ने छापली.

आणीबाणीचे काळेकुट्ट वर्ष पूर्ण व्हायची वेळ आली. 'साधना'चा एक विशेषांक काढायचे ठरले. मजकुराची जमवाजमव सुरू झाली. जॉर्ज फर्नांडिस यांचे भूमिगत असतानाचे चिंतन, त्यांच्या भावाच्या छळवादाची कहाणी, लोकशाहीचा अन्वयार्थ समजून सांगणारा नरहर कुरुंदकरांचा लेख, नागपूरचे भास्कर भोळे यांचा लेख, सूचक असे आवरण, प्रत्येक लेख हा चेतवणारा एक स्फुल्लिंगच होता. पण अंकाची छपाई सुरू झाली आणि मुंबईहून पुन्हा सावधानतेचे इशारे सारखे येऊ लागले. हा अंक तर सरकारच्या हाती पडताच कामा नये; लोकांपर्यंत तो पोहोचलाच पाहिजे अशी चिंता निर्माण झाली.

'साधना'च्या पानावरचा 'साधना' हा निर्देश कधीच बंद करून टाकला होता. सरकारने काही बांधा आणलाच तर नानासाहेब गोरे यांच्या वाढदिवसाची स्मरणिका म्हणून अंक प्रकाशित करायची तयारी ठेवली. जयप्रकाशांनी 'साधना'ची पाठ थोपटणारे स्वतःच्या हस्ताक्षरातले पत्र पाठवले होते. पण त्याचा ब्लॉक तयार करून घेण्यालाही सायास पडले. शेवटी अंक पूर्ण तयार करून पोस्टात गेला. इतरत्रही प्रसृत झाला. 'लोकशाही : अन्वय आणि अर्थ' ही पुस्तिकाही तयार होऊन सर्वत्र रवाना झाली. सुटकेचा निःश्वास सोडला. एक वर्षभर 'साधना'ने स्वातंत्र्याची मशाल तेजाळत ठेवली होती. २६ जूनला पुन्हा एकदा धरपकडीचा एक फेरा झाला.

वर्षातले एकूण एक अंक जप्त होणे हा वृत्तपत्रांच्या इतिहासातला बहुधा उच्चांक असावा. पुढच्या शनिवारी श्री. मधु वाणी यांच्या संपादकत्वाखाली अनियतकालिक म्हणून 'कर्तव्य' प्रकाशित झाले आणि रवानाही झाले. 'कर्तव्य' शीर्षकाची 'साधना'च आहे, हे सहजच ध्यानी येण्यासारखे होते. 'बुलेटिन' काढण्याबद्दलचा महात्मा गांधींचा उतारा, राजबंदी परिवारांच्या छळवादाची मुखपृष्ठावर कहाणी, जनतंत्र समाजाच्या वार्षिक अधिवेशनाचा तपशीलवार कुठेच येऊ न शकलेला वृत्तांत, सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वि.म. दांडेकर यांची सद्यःस्थितीबद्दलची परखड मुलाखत, सिंहाने मेष राशीत प्रवेश केल्यामुळे 'केसरी'च्या आमंत्रणावरून लिहिलेला आणि परत आलेला नानासाहेब गोरे यांचा अमेरिकन स्वातंत्र्याच्या द्विशताब्दीनिमित्त लिहिलेला लेख, नागरिक स्वातंत्र्याचे लढे लढवणारे प्रसिद्ध कायदेपंडित श्री.चंद्रकांत दरू यांच्या बेमुर्वत अटकेची हकीकत, २६ जूनला 'साधना'त भरलेल्या सहचिंतन सभेचा वृत्तांत, अजित कांबळे आणि डॉ.बाबा आढाव यांचे 'दुबळ्या घटकांच्या मदतीच्या नावाने सरकारने चालवलेली फसवणूक' दाखवून देणारे लेख, जुलैच्या दोन दिवसातली सरकारच्या वाणी-वर्तनातील ढोंगबाजी असा सगळा मजकूर होता.

एकच गोष्ट झाली होती. दोन पैशांऐवजी वीस पैशांची तिकिटे लावून हा अंक पाठवावा लागला होता. मग

'कर्तव्य' अनियतकालिकच सुरू झाले. त्याची झळ जनवाणी प्रेसला पोचणार हे अपेक्षितच होते. त्याप्रमाणे जामीन मागणारा हुकूम सुटला. जनवाणी प्रेसचे संचालक श्री.शिरुभाऊ लिमये मिसात बंदच होते. त्यांच्या वतीने श्री.दळवी यांनी कोर्टातून स्टे मिळवला.

मधल्या काळात अख्खा अंक आक्षेपार्ह ठरवणे आणि हजार रुपयांचा जामीन मागून जप्त करणे, याबद्दलची केस सुनावणीला निघाली. पंचवीस हजारांचा जामीन, साधना बंद करण्याचा हुकूम, साधना व जनवाणी प्रेसकडून जामीन या केसेसही दाखल केलेल्या होत्या.

महाराष्ट्र सरकार इतके हुशार, की 'साधना'च्या केससाठी त्यांनी मराठी न जाणणाराच कायदेपंडित मुख्य वकील म्हणून नेमला! इंग्रजी भाषांतर सरकारला करून द्यावे लागले. सुनावणीच्या वेळच्या गमतींचा एक ग्रंथ होईल.

'लोकशाही समाजवाद हे ध्येय धरा, ते तारील. भारतात रक्तपात न होत समाजवाद येवो. व्यक्तिस्वातंत्र्यासह समाजवाद फुलो!' हे आणीबाणीनंतरच्या पहिल्या अंकातले वाक्य! साने गुरुजींच्या लालित्यपूर्ण, विचारप्रगल्भ शैलीचे भाषांतर करणे हा पोरखेळ नव्हे. सरकारी विद्वानांनी 'भारतात रक्तपात न होता समाजवाद येवो!' याचे भाषांतर 'लेट देअर बी ब्लडलेस सोशालिझम' असे केले. वास्तविक भाषांतर पाहिजे होते, 'लेट देअर बी सोशॅलिझम विदाऊट ब्लडशेड!' पण सरकारी भाषांतरकारांनी त्याचा ब्लडलेस ॲनिमिक सोशालिझम करून टाकला.

'साधना'च्या मुखपृष्ठावर काळा निषेधदर्शक ब्लॉक सतत काही महिने छापला. त्याचाही प्रश्न निघाला. त्यामुळे विध्वंस, हिंसा, अराजक कसे माजते ते काही सरकारी वकिलाला सांगता येईना.

बारा दिवस खटल्याचे काम चालले. सरकारला आपल्या कृत्याचे कायदेशीर समर्थन करता आले नाही. उच्च न्यायालयात 'साधना'च्या बाजूने निकाल लागला. 'साधना'चा जप्त केलेला जामीन परत करण्याचा हुकूम झाला. साधनाच्या वकिलांचा खर्चही सरकारतर्फे देण्याला सांगितले गेले. सरकारने किती चुकीचे धोरण अवलंबले होते, ते वेशीवर टांगले गेले.

'साधना'चा निवाडा झाला तरी पुण्याच्या एकाही वर्तमानपत्रात तो छापला गेला नाही. तेव्हा फार आश्चर्य वाटले! पण पुण्याच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांनी पुण्याच्या वृत्तपत्रांना तोंडीच आदेश दिला होता की, निवाडा 'साधना'च्या बाजूने लागला हे छापता कामा नये. तोंडी दमदाटी करण्याचे हे प्रकार सर्रास सुरू होते!

दोन संपादकमित्रांनी तशी पत्रे निर्भयपणे लिहून दिली. ती घेऊन सरकारच्या ह्या उद्दाम वर्तनाबद्दल दाद मागणारा अर्ज उच्च न्यायालयात दळवींनी दाखल केला. आठदहा दिवस त्यालाही लागले आणि शेवटी निवाड्याची वार्ता प्रसिद्ध करण्याला सरकारला कबूल व्हावे लागले.

पण 'साधना'वरची बंदी एवढे झाले तरी सरकारने उठवली नव्हती. पंचवीस हजार रुपयांच्या जामिनाचा हुकूम परत घेतला नव्हता. 'कर्तव्या'त दुधाची तहान ताकावर भागवीत होते. पण 'साधना' पुन्हा वाचकांना हवी होती.

'साधना'च्या लढ्यात 'साधना' सेवकांचे कमालीचे सहकार्य होते. त्यांच्या सहकार्यावाचून हा लढा होताच ना. पोलिसांनी सेवकांना फितवण्यासाठी आमिषांचा वापर करण्याचा केलेला प्रयत्न सर्वस्वी वाया गेला. जनवाणी प्रेस या लढ्यात आधी पणाला लावायचा असा निर्णय झाला, तरी त्या छापखान्याची सर्व कामे रेटून नेण्याची कुवत नव्हती. 'साधना' प्रेसलाच जनवाणी प्रेसची कामे अनेकदा करावी लागत आणि कुठल्याही प्रकारे कुरकुर न करता, 'साधना'चे सेवक आनंदाने आणि हुशारीने हे सर्व कार्य पार पाडत. लोकशाही स्वातंत्र्याच्या या लढ्याशी तेही सर्वार्थी समरस झाले होते. 'भाकरी की स्वातंत्र्य' हा भ्रामकच प्रश्न असतो. भाकरी मिळवण्यासाठीदेखील स्वातंत्र्याची आवश्यकता असते. श्रीमंतांना राज्यकर्त्यांच्या कानाशी लागायला नोटांची ऊब पुरते. गरीबदुबळ्यांना तिथे प्रवेशच नसतो. आवाज उठवला तरच तो महालात सुखाच्या कडेलोट बंदोबस्तात बसणाऱ्यांच्या कानी गेला तर जाणार! 'साधना'च्या सेवकांना ही जाणीव होती. दलितांची गाऱ्हाणी 'साधना'ने लावून धरली होती. पांगरीपुट्ट्याचे डॉ.वसंत गायकवाड आपल्या समतेच्या हक्कांसाठी लढत होते. त्यांना मिसा नं. २ म्हणजे गुन्हेगार म्हणून अडकवून ठेवले होते. त्यांनी अर्जविनंत्या करून सरकारची दारे ठोठावली, पण व्यर्थ. मग 'साधना-कर्तव्या'तून त्यांचे गाऱ्हाणे वेशीवर टांगावे लागले. अशी किती तरी प्रकरणे या काळात घडली. राजबंदी परिवार-साहाय्य निधीतूनच त्यांना वेळीवेळी मदतही पोचती करण्यात आली.

संधी अनेकदा संकटांच्या रूपानेही येते. हा चिंतेचा काळच मुळी 'साधना'चा सुवर्णकाळ होता.

(साधनाच्या सुवर्णमहोत्सवी वर्ष विशेषांकात-
१५ ऑगस्ट १९९८ च्या अंकात हा लेख प्रसिद्ध
झालेला आहे.)

# नरो वा कुंजरो वा : आणीबाणीतील न्यायपालिका

प्रतापसिंह साळुंके



पुन्हा एकदा सेवाज्येष्ठता डावलून सरकारपक्षाची बाजू उचलून धरणारे न्यायमूर्ती बेग यांची सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. हे असे होणार याची पुरेपूर जाणीव न्यायमूर्ती खन्ना यांना होती, तरीसुद्धा सरन्यायाधीशपदापेक्षा आपल्या सदसद्विवेकाचा आवाज त्यांनी जास्त मोलाचा मानला. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन (झालेल्या अन्यायाचा) निषेध नोंदविला. 'न्यूयॉर्क टाइम्स'ने त्यांच्या या कृतीचे भरभरून कौतुक करताना 'भारतीय न्यायपालिकेचा इतिहास लिहिला जाईल, त्या वेळी एच.आर.खन्ना यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल,' असे लिहिले होते; ते तंतोतंत खरे ठरले.

'न्यायालयीन सक्रियता' हा आता नावीन्य न उरलेला शब्दप्रयोग बनला आहे; मग तो कोळसा खाणवाटपाबाबत अवलंबलेली प्रक्रिया असो अथवा २-जी स्पेक्ट्रमचा लिलाव, सी.बीआय.वरचे नियंत्रण ठेवण्याबाबतची केंद्र सरकारची सक्षमता असो वा माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ अ ची वैधता, लोकप्रतिनिधींना शिक्षा झाल्यानंतर त्यांच्या प्रतिनिधित्वावर येणारे निर्बंध असो वा इच्छामरणाची सांविधानिक वैधता. या आणि अशा किती तरी प्रकरणांमध्ये न्यायालयाने दाखविलेली सक्रियता सर्वसामान्यांच्या दृष्टीने कायमच खूप मोलाची कामगिरी बजावणारी होती. स्वतंत्र भारताच्या संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला कायद्याच्या राज्याची दिलेली ग्वाही प्रत्यक्षात येण्यासाठी, न्यायालयांचे स्वातंत्र्य आणि अधिकार वापरण्यातील त्यांची तत्परता व सक्षमता अत्यंत महत्त्वाची मानली जाते. पण हे सगळे सुरू झाले ते प्रामुख्याने १९८० च्या दशकात; म्हणजे आणीबाणी (होय तीच, कायम वादग्रस्त ठरलेली, २५ जून १९७५ च्या मध्यरात्री पुकारलेली अन् पुढे १९ महिने देशाच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनात उलथापालथ घडवणारी) पुकारल्यानंतर. या राष्ट्रीय आणीबाणीच्या थोडेसे अगोदर आणि मुख्यत्वेकरून आणीबाणी चालू असताना न्यायपालिकेचे वर्तन कसे होते, याचा शोध घेणे आवश्यक आहे. कारण असे म्हटले जाते की, 'एखाद्या माणसाचे खरे चारित्र्य समजून घ्यायचे असेल, तर शांततेच्या काळात तो कसा वागतो यापेक्षा संकटकाळात वा आणीबाणीच्या परिस्थितीत तो कसा वागतो, यावर ते ठरत असते!' दि.२५ जून २०१५ रोजी या राष्ट्रीय आणीबाणीला चार दशके पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने या सगळ्याचा वेध घेणे अधिक सयुक्तिकही ठरेल.

भारतीय न्यायपालिकेचे मूल्यमापन करत असताना, फक्त आणीबाणीच्या काळावरच लक्ष केंद्रित करून आपल्याला संपूर्ण परिस्थितीची कल्पना येऊ शकणार नाही. कारण ते फक्त एका तुकड्याचे झालेले दर्शन असेल. सर्वांगाने हा विषय समजून घ्यायचा असेल तर, स्वातंत्र्योत्तर काळाच्या अगदी सुरुवातीच्या वर्षांपासून त्याचा गोषवारा घेणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीचे व कामकाजाचे उद्‌घाटन करताना, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केलेल्या

भाषणातील काही वाक्ये फार विचार करायला लावणारी आहेत. ते म्हणाले होते, "कायदे बनविणे ही जबाबदारी लोकशाही-प्रक्रियेत लोकांनी मतदानाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींवर टाकली आहे. त्यामुळे संसदेची दोन सभागृहे मुख्यत्वेकरून कायदे बनविण्यासाठीच निर्माण केली आहेत आणि ती जबाबदारी संविधानाने त्यांच्यावरच टाकलेली आहे. त्यामुळे न्यायपालिकेने न्यायदान करीत असताना स्वत:च संसदेच्या तिसऱ्या सभागृहाची भूमिका स्वीकारू नये!" पंडित नेहरूंच्या या विधानात कायदे मंडळ, न्यायपालिका व प्रशासन या तीन स्तंभांनी एकमेकांच्या कार्यकक्षेत हस्तक्षेप करू नये या तत्त्वाचे पुनरुच्चारण असले; तरी लोकांच्या भावभावना व अपेक्षा यांची काळजी घेणे हे काम कायदे मंडळाचेच असल्याने न्यायालयाने त्यात हस्तक्षेप करू नये, असे सुचविले होते.

पंडित नेहरूंच्या राजकीय भूमिकांबद्दल विविध मतमतांतरे असली तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव वा करिश्मा सर्व क्षेत्रांवर होता, हे त्यांचे वैचारिक विरोधकही मान्य करतात. त्यामुळेच की काय, पण पंडित नेहरू पंतप्रधान होते त्या काळात व त्यांनी घेतलेल्या निर्णयांच्या विरोधात न्यायालयाने विरोधी भूमिका घेतली किंवा सरकारी निर्णयप्रक्रियेत हस्तक्षेप केला, अडथळा निर्माण केला असे सहसा आढळून येत नाही. त्या काळात कायदे मंडळ व न्यायपालिका यांच्यातही फारसा संघर्ष वा तणाव निर्माण झाला नाही, त्यामागे नेहरूंचे व्यक्तिमत्त्व वा त्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव असल्याचे कारण कायद्याचे अनेक अभ्यासकसुद्धा मान्य करतात. काही अभ्यासक याचे श्रेय नेहरूंच्या मागे असणाऱ्या प्रचंड बहुमताला देतात आणि जेव्हा राजकीय स्थिरता असते तेव्हा न्यायालयीन सक्रियता कमी असते, तर राजकीय अस्थिरता असते, त्या वेळी न्यायालयीन सक्रियता अधिक प्रमाणावर पाहायला मिळते; असे निरीक्षण नोंदवतात. या निरीक्षणाकडे अगदी अंतिम सत्य म्हणून नाही पाहिले, तरी त्यात बरेचसे तथ्य आहे. पंडित नेहरूंच्या आकस्मिक निधनानंतर लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले, तेव्हा स्वपक्षीयांच्या सततच्या कुरघोड्यांमुळे एकहाती अंमल ठेवणे त्यांना शक्य झाले नाही, असे मत राजकीय विश्लेषक व्यक्त करतात.


न्या. शेलाट


न्या. ग्रोव्हर


न्या. हेगडे


न्या. ए. एन. रे

लालबहादूर शास्त्रींचे अल्पकाळातच झालेले आकस्मिक निधन यामुळे संपूर्ण देशाला स्वीकारार्ह वाटेल असा चेहरा असावा, पण सत्तेच्या खऱ्या चाव्या आपल्याच हाती राहाव्यात असे काँग्रेस पक्षातील ज्येष्ठांना वाटल्याने इंदिरा गांधी यांच्याकडे नेतृत्व देण्यात आले. पण त्या सर्वांना आपले आडाखे चुकल्याचे लवकरच लक्षात आले. इंदिरा गांधी (राजकारणात नवख्या असल्याने) सत्तासंचालनात आपल्यावरच अवलंबून राहतील, या भ्रमात असलेल्या ज्येष्ठांना आपल्या सत्ता-आकांक्षांना लगाम घालावे लागले; पण यातूनच सुरू झाला पंतप्रधानपदाच्या खुर्चीवर दावा सांगणारा सत्तासंघर्ष. आणि मग केंद्रिय राजकारणातील या अस्थिरतेची प्रतिक्रिया न्यायालयीन सक्रियतेत प्रतिबिंबित होऊ लागली.

या संघर्षाची सुरुवात कधी व कशी झाली? सामाजिक हिताचा दाखला देऊन नागरिकांचे मूलभूत अधिकार संसदेला काढून घेता येणार नाहीत, असा महत्त्वपूर्ण निकाल गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य या खटल्यात देण्यात आला. संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार असला तरी तो अनिर्बंध नाही, त्यावर मर्यादा आहेत- हा त्या निकालाचा सोपा अर्थ. त्यामुळे लोकांचे कैवारी म्हणवून घेण्याचा अधिकार फक्त लोकनियुक्त सरकारचाच नाही, तर न्यायालयेही लोकांचे हितरक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहेत, हाच संदेश या निकालातून दिला गेल्याचे मानले जाते. 'संसद श्रेष्ठ की न्यायपालिका?' या संघर्षालाही इथूनच सुरुवात झाल्याचे सांगितले जाते. म्हणजे आपापले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी संसद व न्यायपालिका सिद्ध झाल्या. सत्तरच्या दशकात हा संघर्ष अधिक तीव्र बनला. आणि मग संसदच कशी सर्वश्रेष्ठ आहे, हे सिद्ध करण्यासाठी २४ वी व २५ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. संसद हीच लोकांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करते, आणि इतर कुठल्याही संस्थेपेक्षा संसद श्रेष्ठ आहे, असे बिंबवण्याचा तो प्रयत्न होता. सन १९७१ मध्ये इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने मोठ्या बहुमताने केंद्रात सत्ता स्थापन केल्यानंतर, न्यायालयाने गोलकनाथ खटल्यात जे काही केले होते, ते पूर्णपणे पुसून टाकण्याचा प्रयत्न या दोन घटनादुरुस्त्यांमधून केला गेला. या दोनही घटनादुरुस्त्यांची वैधता व सांविधानिकता यांना केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या खटल्यात आव्हान देण्यात आले होते. यामध्ये ऐतिहासिक निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की- संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार असला व त्याद्वारे मूलभूत अधिकारांमध्ये बदल करणे शक्य असले; तरी राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेला धक्का लावण्याचा वा त्यात बदल करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे गोलकनाथ खटल्यात सरसकट सर्वच घटनादुरुस्त्या- ज्या की मूलभूत अधिकारांशी संबंधित होत्या त्या करता येणार नाहीत, असे म्हटले होते; त्याला केशवानंद भारती खटल्याने नकारार्थी उत्तर दिले असले तरी राज्यघटनेची मूलभूत संरचनेची नवीन मर्यादा घटनादुरुस्तीवर घालण्यात आली. सांविधाचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ.उपेंद्र बक्षी यांच्या मतानुसार तर 'मूलभूत संरचना' हा शब्दप्रयोग केवळ न्यायमूर्ती एच.आर.खन्ना यांनी केला होता. ते त्यांचे वैयक्तिक मत होते. आणि केवळ न्यायमूर्ती खन्ना बहुमतामध्ये होते म्हणून त्यांनी केलेला शब्दप्रयोग हा बहुमताचा निकाल समजणे असंजसपणाचे आहे. डॉ.बक्षी यांचे हे मत ग्राह्य धरल्यास, केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या निकालावर आधारलेला अनेक खटल्यांचा डोलारा कोसळेल आणि मग नवे सांविधानियक पेच निर्माण होतील. यात सर्वांत विचार करायला लावणारी गोष्ट म्हणजे, 'राज्यघटनेची मूलभूत संरचना म्हणजे काय?' हे न्यायालयाने स्पष्ट केले नव्हते. त्यातील काही तत्त्वांचा उच्चार निकालपत्रात असला तरी, नव्या तत्त्वांचा अंतर्भाव करण्याचा अधिकार न्यायालयाने स्वत:कडेच ठेवला होता. म्हणजे राज्यघटनेचा अन्वयार्थ लावणे व त्याची मूलभूत संरचना ठरविण्याचा अधिकार न्यायालयाने स्वत:कडे ठेवल्याने, न्यायालयाने संसदेवर सरशी केल्याचे चित्र निर्माण झाले. आता पलटवार करण्याची वेळ संसदेची होती.

प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया ही मिळतच असते, या न्यूटनच्या तत्त्वाचे प्रतिबिंब संसद व न्यायालय या संघर्षातही पाहायला मिळते. केशवानंद भारती या खटल्यामुळे न्यायालयांचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाल्याने, सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश म्हणून आपल्या मर्जीतील न्यायाधीशाची नेमणूक केल्यास न्यायालयाच्या अनेक प्रशासकीय बाबींवर- (नियुक्त्या, पदोन्नती, बदली, पदावनती यांवर नियंत्रण ठेवता येईल हा विचार सरकार पक्षाच्या मनात बळावला.) या भूमिकेतून सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सिक्री निवृत्त झाल्यानंतर न्यायमूर्ती जे.एम.शेलाट, न्यायमूर्ती के.एस.हेगडे किंवा न्यायमूर्ती ए.एन.गोव्हर यांना सेवाज्येष्ठतेनुसार सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती मिळावयास हवी होती; परंतु या सर्व ज्येष्ठांना डावलून न्यायमूर्ती ए.एन.रे यांची त्या पदावर नियुक्ती करण्यात आली. ज्या तीन न्यायमूर्तींना पदोन्नतीत डावलले

होते, त्यांनी केशवानंद भारती खटल्यात सरकारच्या विरोधात कौल दिला होता, तर न्यायमूर्ती ए.एन.रे यांनी सरकारच्या बाजूने कौल दिला होता. न्यायालयाने कायद्याचा काय अन्वयार्थ लावायचा, हे सरकारच्या हातात नसले; तरी जे न्यायाधीश तो अन्वयार्थ लावणार आहेत, तेच आपल्या मर्जीतील असतील तर आपल्याला अनुकूल असलेला अन्वयार्थ लावला जाईल, असा साधा-सरळ 'हिशोब' या नियुक्तीमागे होता. न्यायपालिकाही या प्रकारच्या नियुक्तीने गांगरून गेली. स्वातंत्र्योत्तर काळात सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजाच्या पहिल्या दिवसापासून अनेक दशके जो अलिखित नियम होता- तो म्हणजे सर्वांत ज्येष्ठ न्यायमूर्तींची सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याचा- तो न्यायमूर्ती ए.एन.रे यांच्या नियुक्तीमुळे पहिल्यांदाच पाळला गेला नव्हता. या सर्व प्रकाराला नेमकी प्रतिक्रिया काय द्यावी, हे न्यायपालिकेलाही सुचत नव्हते. शेवटी या सर्व प्रकाराने उद्विग्न होऊन सेवाज्येष्ठता डावललेल्या तीनही न्यायमूर्तींनी आपल्या पदाचे राजीनामे दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींवर अन्याय झाल्यास त्यांनी कोणाकडे दाद मागायची, हाही प्रश्नच होता! भविष्याच्या उदरात जे खटले न्यायालयात चालणार होते, त्यांत सरकारच्या बाजूने कौल न देणाऱ्या न्यायाधीशांना डावलले जाणार आणि सरकारच्या बाजूने कौल देणाऱ्या न्यायाधीशांना बक्षिसी मिळणार असा तो स्पष्ट संदेश होता. ज्येष्ठ विधिज्ञ टी.आर.अध्यार्जुना यांनी केशवानंद खटल्याशी निगडित बाबींवर लिहिलेले 'केशवानंद भारती खटला : संसद व न्यायपालिकेच्या श्रेष्ठत्वाच्या संघर्षाची न सांगितलेली गोष्ट' या पुस्तकात फारशा माहीत नसलेल्या व दंतकथा वाटाव्यात इतक्या विलक्षण पण सत्य घटना नमूद केल्या आहेत. न्यायालयांच्या भिंतींआडही सारे काही आलबेल नसल्याचे लेखकाने नमूद केले आहे.

इकडे राजकीय आघाडीवरही बऱ्याच घडामोडी घडत होत्या. इंदिरा गांधींनी पक्षसंघटनेवर व सरकारवर मजबूत पकड मिळविली असली, तरी त्यांच्याही नेतृत्वाला आव्हान देण्याचे प्रयत्न स्वपक्षातूनच होत होते. त्यामुळे मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांविषयी त्यांच्या मनात अविश्वास वाढीस लागला होता. निवडणुकांमध्ये दिलेली आश्वासने व वास्तव यातील तफावतीमुळे सरकारविरोधात असंतोष वाढीस लागला होता. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील विद्यार्थी चळवळीचे लोण बिहार राज्याबाहेरही प्रसरण पावत भारतभर पसरत होते. या सर्वांमध्ये भर पडली ती अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका निकालाची. इंदिरा गांधी यांची निवड निवडणुकीतील गैरप्रकारांमुळे रद्दबादल ठरवली गेली. लोकसभेच्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांच्याकडून पराभूत झालेले प्रतिस्पर्धी उमेदवार राजनारायण यांनी ही याचिका दाखल केली होती. या निकालामुळे इंदिरा गांधी यांना पंतप्रधानपदावर राहण्याचा कोणताही अधिकार नाही, असा आवाज विरोधकांमध्ये जोर धरू लागला. (यात स्वपक्षीय विरोधकही आलेच) या निकालाच्या प्रतिक्रिया देशभरात उमटल्या. त्यांनी त्या पदावर तसेच राहावे यासाठी इंदिरा गांधी यांचे समर्थक त्यांच्या निवासस्थानाबाहेर जमत होते. (काही राजकीय अभ्यासकांच्या मते, ही जमवलेली गर्दी होती; त्या पाठीमागे इंदिरा गांधींचे सुपुत्र संजय गांधी यांची व्यूहरचना होती.) तर, विरोधी पक्षातील लोक इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदावरून पायउतार व्हावे म्हणून त्यांच्यावर दबाव टाकण्यासाठी राजकीय कोंडी करू पाहत होते. दरम्यान जयप्रकाश नारायण यांनी क्रांतीचा नारा देत संपूर्ण देशभर सरकारविरोधात वातावरण तयार केले होते. वाढता भ्रष्टाचार, आवाक्याबाहेर जाणारी महागाई, विद्यार्थी संघटनांची होत असलेली गळचेपी यांसारख्या समस्यांनी सर्वसामान्य माणूसही हवालदिल झाल्याने सरकारसमोरचा पेच वाढतच होता. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालविरोधात सर्वोच्च न्यायालयात फेरविचार करण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. ही याचिका प्रलंबित असतानाच एका घटनादुरुस्तीद्वारे (४२ वी घटनादुरुस्ती) राष्ट्रपती, पंतप्रधान यांसारख्या महत्त्वाच्या पदांच्या निवडणुकीच्या वैधतेबाबत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करण्यास न्यायालयांना मज्जाव करण्यात आला होता. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. निकालाचा दिवस उजाडला. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कृष्ण अय्यर यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयास काही अटी घालून मनाई हुकूम दिला. इंदिरा गांधींच्या बाजूने ज्येष्ठ विधिज्ञ नानी पालखीवाला यांनी युक्तिवाद केला होता. सर्व देश त्यांच्या (इंदिरा गांधींच्या) पाठीशी ठामपणे उभा असल्याने, अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालविरोधात विनाअट मनाई हुकूम द्यावा, अशी विनंती त्यांनी न्यायालयाला केली होती; पण न्यायमूर्तींनी तसे करण्यास नकार देऊन, काही अटी घालून मनाई हुकूम दिला. बरवर पाहता, न्यायमूर्ती

कृष्ण अय्यर यांनी इंदिरा गांधी यांच्याविरोधात निर्णय दिला, असा गैरसमज होऊ शकतो. पण गंमत म्हणजे, मनाई हुकूम देत असताना घातलेल्या अटी (इंदिरा गांधी यांना सभागृहात मतदानात भाग घेता येणार नाही व अधिवेशनाशी संबंधित काही तांत्रिक बाबींमध्ये सहभागी होण्यावर मर्यादा) महत्त्वाच्या जरूर होत्या; पण निकाल दिला गेला, त्या वेळी ना अधिवेशन चालू होते, ना नजीकच्या काळात ते चालू होणार होते. मग या अटींचा 'अर्थ' काय? असा विचार करायला भाग पाडणारा प्रश्न ज्येष्ठ विधिज्ञ प्राध्यापक डॉ.उपेंद्र बक्षी यांनी 'सर्वोच्च न्यायालय व राजकारण' या पुस्तकात विचारला आहे. या पुस्तकाची मध्यवर्ती कल्पनाही मोठी विचारगर्भ आहे. खरे 'राजकारण' कोण करते? खादी घातलेले संसदेत बसलेले रूढ अर्थाने राजकारणी समजले जाणारे लोक, की काळा झगा परिधान करून न्यायमूर्तींची वस्त्रे लेवून बसलेले न्यायमूर्ती? अगदी सर्वच नसले, तरी काही खटल्यांमध्ये न्यायमूर्तींनी तत्कालीन राजकारणाला एक वेगळे वळण लावून राजकीय भूमिका घेतल्याचे वा त्याला पूरक ठरेल अशी योजना निकालपत्रात जाणीवपूर्वक केल्याचे निरीक्षण अनेक विधिज्ञांनी नोंदवले आहे.

परिस्थिती स्फोटक बनत असताना, सरकारविरोधात जनमत प्रक्षुब्ध होत असताना त्या सगळ्याचा कडेलोट होऊन त्यात सरकार आपली सत्ता हरवून बसेल; या भीतीपोटी व आपली पंतप्रधानपदाची खुर्ची शाबूत ठेवण्यासाठी २५ जूनच्या मध्यरात्री व २६ जूनच्या पहाटे इंदिरा गांधींनी देशात राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा केली. आणीबाणी पुकारण्याबाबत खूप टोकाची मतमतांतरे अभ्यासकांमध्येही पाहायला मिळतात. पण यात अनेक वेळा अभिनिवेश वा धिक्काराचा पवित्राच जास्त पाहायला मिळतो. बिपीन चंद्रा या ज्येष्ठ इतिहासकाराने आणीबाणीसाठी इंदिरा गांधी यांच्या एकाधिकारशाहीला जितके जबाबदार धरले आहे, तेवढेच जयप्रकाश नारायण यांच्या दुराग्रहालाही जबाबदार मानले आहे. इथे एक गोष्ट आवर्जून नमूद करायला हवी; ती म्हणजे आणीबाणीच्या सुरुवातीच्या काळात भारतातील तथाकथित विचारवंत व बुद्धिवादी यांची प्रतिक्रिया. भारतीय राज्यघटनेचे अमेरिकन अभ्यासक ग्रेनविल ऑस्टीन यांनी इंदिरा गांधी यांची (आणीबाणी पुकारल्यानंतरच्या काळात) भेट घेतली होती. त्यावेळी या पुकारलेल्या आणीबाणीला विचारवंत वा बुद्धिवादी मंडळींकडून जितका तीव्र विरोध होणे अपेक्षित होते, त्या तुलनेत होणारा विरोध बराच कमी असल्याने इंदिरा गांधींनाही आश्चर्य वाटत होते. आपल्या 'वर्किंग अ डेमोक्रॅटिक कॉन्स्टिट्यूशन : अ हिस्टरी ऑफ इंडियन एक्सपिरिअन्स' या पुस्तकात ग्रेनविल ऑस्टीन यांनीही विचारवंतांच्या मौनाबाबत आपले निरीक्षण नोंदविले आहे. आणीबाणी पुकारली गेली, तेव्हा भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५८ व ३५९ अन्वये नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा संकोच करून त्यांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली. या स्थगितीमुळे सामान्य नागरिकांना न्यायालयाचे दरवाजे बंद झाले. प्रशासनाच्या हातात अनिर्बंध अधिकार आणि हतबल न्यायालये अशी परिस्थिती जरी वरवर पाहता वाटत असली, तरी सर्व अर्थांनी न्यायालये हतबल होती का, हे पाहणेही उद्‌बोधक ठरते. न्यायालये सर्वसामान्य माणसांचे हक्क-अधिकार यांचे तारणहार म्हणून भूमिका पार पाडत होती, की राजसत्तेशी संघर्ष करून आपले हात पोळून घेण्यापेक्षा बचावात्मक पवित्र्यात गेली होती? हे पाहणेही एका प्रगल्भ लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी महत्त्वाचे ठरते. काय होती न्यायपालिकेची भूमिका?

इंदिरा गांधींनी जून १९७५ ची आणीबाणी पुकारण्याअगोदर १९७१ मध्ये भारत-पाक युद्धामुळे देशात परकीय आक्रमणाच्या कारणावरून एक राष्ट्रीय आणीबाणी पुकारली होती. खरे तर युद्धसमाप्तीनंतर ती संपायला हवी होती, पण युद्धसमाप्तीनंतर तिचे प्रयोजन उरलेले नसतानाही ती लागूच ठेवली होती. या आणीबाणीला भूतनाथ विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य या खटल्यात आव्हान देण्यात आले होते. सन १९७४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आपला निकाल दिला. आणीबाणी ही राज्यघटनेच्या कलम ३५२ नुसार घोषित करण्यात आल्यामुळे, या कलमाला अपेक्षित असणाऱ्या परिस्थितीतच आणीबाणी पुकारता येईल किंवा चालू ठेवता येईल, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या बाजूने करण्यात आला होता. खरे तर अतिशय महत्त्वपूर्ण अशी बाब न्यायालयीन मूल्यमापनासाठी आलेली होती; परंतु देशाच्या सर्वोच्च न्यायालयाची भूमिका मात्र अतिशय खेदजनक होती. त्या आणीबाणीच्या सांविधानिकतेविषयी न्यायालयाने चकार शब्दही काढला नाही; उलटपक्षी 'आणीबाणीची वैधता तपासणारे आम्ही कोण?' असा अजब पवित्रा न्यायालयाने घेतला. आम्ही या खटल्यात निकाल देऊ शकत नाही, कारण हा 'राजकीय प्रश्न' आहे आणि न्यायालये केवळ कायदेशीर बाबींमध्येच हस्तक्षेप करू शकतात, असे न्यायालयाने नमूद केले. आपल्या या भूमिकेच्या समर्थनार्थ बेकर विरुद्ध कार या १९६२ मध्ये निर्णय झालेल्या अमेरिकन

खटल्याचा दाखला देण्यात आला. खरे तर या खटल्याचे निकालपत्र वाचताना लक्षात येते की- 'राजकीय प्रश्न' अशी काही ढाल न्यायालयासाठी उपलब्ध नसून, ज्या-ज्या खटल्यात सांविधानिक वा कायदेशीर बाबींचा अंतर्भाव झालेला असेल, तिथे तिथे न्यायालयाचा हस्तक्षेप उचित असल्याचे त्या न्यायालयाने नमूद केले आहे. जर १९६२ मध्येच हा प्रश्न निकालात काढला होता, तर त्याच खटल्याचा आधार घेऊन आम्ही या खटल्यात निकाल द्यायला समर्थ नाही, सांविधानिक तरतुदींच्या आमच्यावर मर्यादा आहेत; तुम्हाला हवे असल्यास तुम्ही जनतेच्या न्यायालयात दाद मागा, तेच योग्य माध्यम आहे; (म्हणजे सार्वत्रिक निवडणुका) असे म्हटले. हे सर्व वाचत असताना आणीबाणीनंतरच्या जवळपास चार दशकांनंतर आजही आपण चक्रावून जातो. मग ऐन आणीबाणीत न्यायालयाने हात वर केल्यास जायचे कोठे? हा मोठा जटिल प्रश्न होता.

या खटल्यानंतर अल्पावधीतच इंदिरा गांधींनी जून १९७५ मध्ये (अगोदरची आणीबाणी अस्तित्वात असताना) अंतर्गत अशांततेच्या कारणावरून दुसरी आणीबाणी पुकारली. या आणीबाणीनंतर विरोधी पक्षांतील जवळपास सर्व प्रमुख नेत्यांची मोठ्या प्रमाणात धरपकड करून त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. मात्र या अटकेच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार, आणि ती अटक वैध आहे की अवैध हे ठरविण्याची न्यायालयीन क्षमता याबाबत न्यायालयीन भूमिका फारशी समाधानकारक नव्हती. ज्यांची धरपकड होत होती, त्यांना आणीबाणी संपेपर्यंत तुरुंगातच खितपत पडावे लागणार होते. या सर्वांच्या विरोधात दाद मागण्यासाठी अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जबलपूर विरुद्ध शिवकांत शुक्ला हा खटला सर्वोच्च न्यायालयात अपील म्हणून दाखल करण्यात आला होता. खरे तर मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने शिवकांत शुक्ला या नागरिकाच्या मूलभूत हक्काच्या बाजूने कौल दिला होता. म्हणजे सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर जरी आणीबाणी अस्तित्वात असली, तरी मर्यादित बाबींसाठी न्यायालयीन हस्तक्षेप सांविधानिक असल्याचा निर्वाळा त्या न्यायालयाने दिला होता. जी भूमिका मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने घेतली होती, तशीच भूमिका आणखी आठ उच्च न्यायालयांनी घेतली होती. खरे




न्या. एच. आर. खन्ना

तर उच्च न्यायालयांची भूमिका सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या हितरक्षणाच्या बाजूची होती, पण त्या-त्या राज्य सरकारांनी त्यांच्या उच्च न्यायालयांच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्या सर्व खटल्यांना एकत्रितपणे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश विरुद्ध शिवकांत शुक्ला या खटल्यात सुनावणीस घेतले होते. (खरे तर सर्वोच्च न्यायालयाने देशातील नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या हितरक्षणाचा पक्ष घ्यायला हवा होता, पण दुर्दैवाने त्याला स्पष्ट शब्दांत नकार दिला.) या खटल्यांची सुनावणी चालू असताना न्यायमूर्ती एच.आर.खन्ना यांनी सरकार पक्षाचे वकील निरेन डे यांना विचारले होते की, समजा- आणीबाणी चालू असताना एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने पूर्ववैमनस्यातून एखाद्या व्यक्तीला अटक करून आमच्यापुढे आणून त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न आमच्या उपस्थितीत चालविला असेल, तर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून आम्ही हातावर हात ठेवून निर्विकारपणे ते सर्व पाहण्याव्यतिरिक्त काय करू शकतो? त्यावेळी निरेन डे यांनी दिलेले उत्तर होते, ''न्यायमूर्ती महाराज, ते तुमच्या आणि माझ्या सदसद्विवेकबुद्धीला हादरवून टाकणारे असले तरी, अशा प्रसंगी कायदेशीर बाजूने पाहायचे झाल्यास न्यायालयांना यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसल्याने व सर्व मूलभूत अधिकार तात्पुरते स्थगित केलेले असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनाही हा प्रसंग निर्विकारपणे पाहण्यापलीकडे काहीही करता येणार नाही.'' हे थंडपणे दिलेले उत्तर विचारांची किती तरी आवर्तने निर्माण करणारे आहे. सर्वोच्च न्यायालयाने बहुमताने दिलेल्या निकालाने निरेन डे यांच्या उत्तराला दुजोराच दिला. नऊ उच्च न्यायालयांच्या निकालांना बहुमताने रद्दबातल ठरविण्यात आले. न्यायालये याबाबत काही करू शकत नाहीत, उलटपक्षी सरकारच्या प्रत्येक कृतीकडे नागरिकांनी व न्यायालयांनी शंकासुराच्या भूमिकेतून न पाहण्याचा सल्लाही यानिमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने दिला.

हे सारे मन उद्विग्न करणारे असले, तरी या काळ्या ढगाला एक सोनेरी किनार होती ती न्यायमूर्ती एच.आर.खन्ना यांच्या अल्पमतातील एकट्याच्या स्वतंत्र निकालपत्राची. सरकारच्या या एकाधिकारशाहीच्या दबावापुढे न झुकण्याची स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली. ज्या नऊ उच्च न्यायालयांनी सर्वसामान्य माणसाच्या मूलभूत अधिकारांच्या रक्षणाची भूमिका घेतली होती, तीच त्यांनीही घेतली होती. या खटल्यातील निकालपत्र लिहिताना त्यांच्या लेखणीला वेगळीच धार चढली होती. त्यांनी त्या निकालपत्रात लिहिले होते की- आणीबाणीच्या काळात सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची सरसकट पायमल्ली होत असताना कायद्याचा यांत्रिकपणे अन्वयार्थ लावून त्याला 'कायद्याचे राज्य' म्हणायचे असेल; तर दुसऱ्या महायुद्धात जे हिटलरने केले, त्यालाही कायद्याचे राज्य म्हणावे लागेल. आपण तसे करणार आहोत का? त्यांच्या या जळजळीत सवालांना ना सर्वोच्च न्यायालयाच्या बहुमताने दिलेल्या निकालपत्राकडे काही उत्तर होते, ना आणीबाणीचे समर्थन करणाऱ्यांकडे. पण सरकारविरोधातील या स्पष्टवक्तेपणाची न्या.खन्ना यांना भरपूर किंमत द्यावी लागली. या निकालपत्रानंतर अल्पावधीतच भारताचे सरन्यायाधीशपद अगोदरच्या न्यायमूर्तींच्या निवृत्तीने रिक्त झाले होते. आणि त्या पदावर सेवाज्येष्ठतेनुसार न्यायमूर्ती एच.आर.खन्ना यांची नियुक्ती होणे अपेक्षित होते; पण घडले भलतेच. पुन्हा एकदा सेवाज्येष्ठता डावलून सरकारपक्षाची बाजू उचलून धरणारे न्यायमूर्ती बेग यांची सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. हे असे होणार याची पुरेपूर जाणीव न्यायमूर्ती खन्ना यांना होती, तरीसुद्धा सरन्यायाधीशपदापेक्षा आपल्या सदसद्विवेकाचा आवाज त्यांनी जास्त मोलाचा मानला. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन (झालेल्या अन्यायाचा) निषेध नोंदविला. 'न्यूयॉर्क टाइम्स'ने त्यांच्या या कृतीचे भरभरून कौतुक करताना 'भारतीय न्यायपालिकेचा इतिहास लिहिला जाईल, त्या वेळी एच.आर.खन्ना यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल,' असे लिहिले होते; ते तंतोतंत खरे ठरले. या घटनेला आज इतकी वर्षे उलटून गेल्यानंतरही त्यांचे नाव मोठ्या आदरानेच घेतले जाते, हीच त्यांची खरी कमाई. जीन मॉनेट यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'या जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक- ज्यांना स्वत:ला कुणी तरी बनायचे असते आणि दोन- ज्यांना स्वत:ला काही तरी करायचे असते.' न्यायमूर्ती एच.आर.खन्ना यांची गणना दुसऱ्या प्रकारच्या लोकांमध्ये करता येईल; कारण ते कुठली मूल्ये मानत होते, ते त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले होते.

सरकारची तळी उचलून न धरल्याने 'शिक्षा' झालेले न्यायमूर्ती एच.आर.खन्ना हे काही एकटेच न्यायमूर्ती नव्हते. इतरही अनेक न्यायमूर्तींच्या- विशेषत: उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या बाबतीत हा अन्याय झाला होता. अगदी आणीबाणी संपल्यानंतरही व जनता पक्षाचे आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतरही या अन्यायाचे निराकरण झाले नव्हते.

सन १९७६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यू.आर.ललित यांना खरे तर नियमाप्रमाणे पूर्णवेळ वा कायम न्यायमूर्ती म्हणून मुदतवाढ मिळणे अपेक्षित असताना; त्यांना ना मुदतवाढ मिळाली, ना त्यांचे पद कायम करण्यात आले. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस.आय.रंगराजन व न्यायमूर्ती आर.एन.अगरवाल या न्यायमूर्तींनी ज्येष्ठ पत्रकार कुलदीप नायर यांची अटक बेकायदा ठरवून त्यांची मुक्तता केली होती. याची शिक्षा म्हणून न्यायमूर्ती रंगराजन यांना कसलीही पूर्वकल्पना न देता, त्यांची बदली आसाम उच्च न्यायालयात (गुवाहाटी उच्च न्यायालय) करण्यात आली. खरे तर त्यांना तशी पूर्वकल्पना देणे सांविधानिक परंपरेनुसार अपेक्षित होते, पण ते सोईस्करपणे टाळले गेले. न्यायमूर्ती अगरवाल- ज्यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे हंगामी न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली होती, त्यांच्या नियुक्तीचा कार्यकाळ संपल्यानंतर त्यांना मुदतवाढ वा कायम नियुक्ती मिळावयास हवी होती; परंतु तसे न घडता त्यांना पुन्हा त्यांच्या मूळ पदावर म्हणजे जिल्हा सत्र न्यायाधीश या पदावर पाठविण्यात आले. खरे तर हेही सांविधानिक परंपरेला धरून घडले नव्हते. न्यायमूर्ती मुखी- जे हृदयविकाराने ग्रस्त होते- त्यांनी त्यांची कलकत्ता उच्च न्यायालयातील बदली काही काळासाठी पुढे ढकलण्याची विनंती केली होती, ती नाकारण्यात आली. त्या धक्क्याने अल्पावधीतच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. गुजरात उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बी.जे.दिवाण व न्यायमूर्ती एस.एच.सेठ यांची बदली पूर्वकल्पना न देता आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात करण्यात आली. यापैकी न्यायमूर्ती सेठ यांनी नियुक्तीला गुजरात उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या खटल्यात गुजरात उच्च न्यायालयाने अशा प्रकारची बदली असांविधानिक ठरविली होती. या निकालाविरोधात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. जरी या खटल्याचा निवडणुकांमुळे निकाल झाला नसला, तरी त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न अत्यंत महत्त्वाचे होते. जेव्हा उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची बदली करण्यात येते; तेव्हा एक तर त्यांना पूर्वकल्पना देऊन त्यांची संमती, त्यांची तयारी या बाबींचा विचार करणे अपेक्षित असते. दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, देशाच्या सरन्यायाधीशांनी या बदलीसाठी संमती देणे आवश्यक होते. खरे तर इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या बदल्यांकडे पाहता सरन्यायाधीशांनी त्याला संमती दिली होती, हे म्हणणे धाडसाचे ठरेल, असे मत खुद्द सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती देसाई यांनी व्यक्त केले होते. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विरुद्ध सरन्यायाधीश असा हा सामना रंगला होता.

जून १९७५ ची राष्ट्रीय आणीबाणी जवळपास १९ महिने अस्तित्वात होती. त्यानंतरही आणीबाणी पुकारण्याच्या अधिकाराची व आणीबाणीच्या कारणांची वैधता तपासण्याचा प्रश्न अनुत्तरितच होता. सन १९७७ मध्ये राजस्थान राज्य विरुद्ध भारतीय संघराज्य या खटल्यात राष्ट्रपती राजवटीची वैधता तपासण्यासाठी आली होती. याही खटल्यात सर्वोच्च न्यायालयाची भूमिका संदिग्धच होती. हे संपूर्ण निकालपत्र वाचत असताना न्यायालयाला आणीबाणी वैध ठरवायची आहे की अवैध ठरवायची आहे, हे स्पष्ट होत नाही. शेवटच्या भागात मात्र सर्वोच्च न्यायालयाने आणीबाणीची घोषणा हा 'राजकीय प्रश्न' असल्याने त्याची वैधता ठरविण्यास नकार दिला. सन १९८० मध्येही मिनर्व्हा मिल विरुद्ध भारतीय संघराज्य या निकालपत्रात आणीबाणीच्या वैधतेबाबत जी चर्चा केली आहे; त्यामुळे असा ग्रह होतो की, आता मात्र न्यायालय आणीबाणीची वैधता यावर भाष्य करेल. पण याही निकालपत्रात आपली निराशाच होते. सन १९८२ मध्ये ए.के.रॉय विरुद्ध भारतीय संघराज्य या खटल्यात संपूर्ण निकालपत्रात अशा पद्धतीने चर्चा केली आहे की, आपली आता खात्री पटते की, हाच तो निकाल ज्याची आपण कित्येक दशके वाट पाहत होतो. पण तिथेही आपल्या हाती फारसे काही लागत नाही. जरी निकालामध्ये भारतीय राज्यघटनेतील कलमे, प्रशासन, कायदा, न्यायतत्त्व, तत्त्वज्ञान या सर्वांची चर्चा असली; तरी एक साधा प्रश्न- ज्याच्या उत्तराची वाट देश फार आतुरतेने पाहत होता, तो म्हणजे राष्ट्रपतीने पुकारलेल्या आणीबाणीची सांविधानिकता न्यायालयाला तपासणे शक्य आहे की नाही? पण त्याचे सरळ उत्तर देणे सर्वोच्च न्यायालयाने याही निकालपत्रात टाळले आहे. कायद्याचे अभ्यासक जरी या साऱ्या निकालपत्राच्या सरस-निरसतेबाबत वेगवेगळे दावे करत असले, तरी एका बाबीवर मात्र त्यांचे एकमत आहे. ते म्हणजे, यातल्या कुठल्याही निकालपत्रात आणीबाणीच्या वैधतेबाबत स्पष्ट शब्दांत हो किंवा नाही असे उत्तर मिळत नाही. खरे तर कुठलाही न्यायालयीन निकाल वा निकालपत्र त्यातील भाषिक सौंदर्यासाठी, लिखाणाच्या शैलीसाठी, प्रासादिक वर्णनासाठी मिथक वा बोधकथांसाठी सर्वसामान्यपणे वाचला जात नाही. एक साधी अपेक्षा या निकालपत्रांकडून असते; ती म्हणजे- जो काही कायदेशीर प्रश्न वा पेच न्यायालयासमोर विचारार्थ आला असेल, त्यात

अति-तांत्रिकतेचा आधार न घेता त्याचे सोपेपणाने उत्तर द्यावे. त्यामुळे आणीबाणीच्या ऐन धामधुमीत आणि त्यानंतरही काही दशके त्यावर थेटपणे भाष्य न करण्याची न्यायालयीन भूमिका मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण करते.

शेवटी या प्रश्नाचा निकाल येण्यासाठी १९९४ हे वर्ष उजाडावे लागले. एस.आर.बोम्मई विरुद्ध भारतीय संघराज्य या निकालात आणीबाणीची वैधता तपासण्याचा अधिकार न्यायालयांना असल्याचे स्पष्ट केले. एक साधा प्रश्न मनात वारंवार येत राहतो; तो म्हणजे- जे सर्वोच्च न्यायालयाला १९९४ मध्ये शक्य झाले, ते १९७४ मध्ये का शक्य झाले नाही? खरे तर अशी कोणती गोष्ट १९७४ मध्ये अडसर होती आणि १९९४ मध्ये ती नसल्यामुळे न्यायालयाने अधिक व्यापक दृष्टिकोन आपल्या निकालपत्रात ठेवला? यांसारख्या प्रश्नांची निश्चित अशी उत्तरे नाहीत.

'सर्वोच्च न्यायालय हे देशातील अंतिम न्यायालय असल्याने ते सर्वोच्च ठरते', अशा आशयाच्या विधानाचा अर्थ आपल्याला अशा निकालपत्रातील चकव्यांमुळे कळत जातो. सर्वोच्च असले तरी ते प्रत्येक निकालात बिनचूकच असू शकते, असे नाही. काही वेळा मानवी मर्यादा न्यायपालिकेच्या निकालपत्रालाही लागू पडतात. कारण न्यायपालिकाही त्यात काम करणाऱ्या मानवांच्या मर्यादांसहित कार्यरत असते. मानवी मर्यादा, चुकण्याची शक्यता, चूक सुधारण्याची इच्छा याही गोष्टी न्यायपालिकेच्या मूल्यमापनात लक्षात घेणे गरजेचे आहे. अशा मूल्यमापनात टोकाचा अभिनिवेश वा दुराग्रही भूमिका यापेक्षा एका अलिप्तपणातून व वस्तुनिष्ठपणे विचार करणे, ही समूहाच्या वैचारिक भरण-पोषणासाठी आवश्यक अशी बाब आहे.

रिनहोल्ड नेबर या तत्त्वचिंतकाच्या मताप्रमाणे, 'मानवाच्या न्याय करण्याच्या क्षमतेमुळे लोकशाही व्यवस्था शक्य झाली, पण मानवाच्या अन्याय करण्याच्या वृत्तीमुळे लोकशाही व्यवस्था गरजेची बनली आहे.' प्रगल्भ लोकशाहीसाठी आणि उन्नत मानवसमूहासाठी नि:पक्ष न्यायपालिका आणि तिची स्वतंत्रता या बाबींसाठी आपण सर्व काळ दक्ष असले पाहिजे. कारण हेराल्ड लास्की या विचारवंताच्या मते, 'नागरिकांची प्रत्येक क्षणी असणारी सतर्कता हीच त्याने त्याच्या स्वातंत्र्यासाठी दिलेली किंमत असते.' नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी सदासर्वदा न्यायालयीन निकालपत्रांवर अवलंबून राहणे किती धोक्याचे ठरू शकते हे आणीबाणी काळातील न्यायपालिकेच्या संदिग्ध वर्तनातून दिसून येते.

केंद्रातील विद्यमान भाजप सरकारने ज्या घाईने न्यायिक निवड आयोग स्थापन करून न्यायाधीशांच्या निवडीमध्ये सरकारचा हस्तक्षेप वाढेल याकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरविले आहे, ते सर्व पाहता आणीबाणीपूर्व काळात काँग्रेस नेते कुमारमंगलम् यांनी एकनिष्ठ न्यायपालिका (इथे एकनिष्ठ म्हणजे न्यायतत्त्वांशी नव्हे तर केंद्र सरकारशी एकनिष्ठ असा अर्थ तज्ज्ञांनी घेणे अपेक्षित आहे.) ही संकल्पना मांडली होती, तिचीच सुधारित आवृत्ती या न्यायिक निवड आयोगाच्या निवडीनंतर पहायला मिळेल. मग अशावेळी आपली न्यायपालिका आता आहे इतकीच सक्रिय राहू शकेल का, हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. अलीकडेच भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनी इंडियन एक्स्प्रेस या दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत, या देशात पुन्हा राष्ट्रीय आणीबाणी पुकारली जाऊ नये यासाठी फारसे संरचनात्मक बदल आपण केले नसल्याने आपले भवितव्य अशा प्रकारच्या आणीबाणीपासून पूर्णत: सुरक्षित नसल्याचे मत व्यक्त केले आहे. सर्व राजकीय पंडितांनी या विधानाचा रोख विद्यमान पंतप्रधानांकडे होता की नव्हता याचीच तावातावाने चर्चा केली, मात्र अपवादानेसुद्धा आणीबाणीची पुनरावृत्ती होऊ शकते का? या महत्त्वपूर्ण मुद्याची चर्चा घडली नाही. खरे तर आताची शांततेची वेळच आणीबाणीच्या चर्चेसाठी योग्य वेळ आहे. कारण लष्करी प्रशिक्षणात असे सांगितले जाते की, 'शांततेच्या काळात तुम्ही जितका जास्त घाम गाळाल, तितके कमी रक्त तुम्हाला युद्धात सांडावे लागेल.' या न्यायाने आणीबाणीच्या भविष्यकालीन वापराबद्दल सर्वांगाने चर्चा होणे गरजेचे आहे.

**प्रा. प्रतापसिंह साळुंके**
Mob. : 9960887411
salunkepb@gmail.com



प्रत्येक व्यक्तीच 'गृहस्वप्न' पूर्ण करण्यासाठी
वास्तूसिध्दी कर्ज योजना
सारस्वत बँक
वास्तू सिध्दी
होम लोन
₹ ७० लाखापर्यंत कर्ज
परतफेडीची मुदत - २० वर्ष
रास्त व्याजदर
फिक्स्ड किंवा फ्लोटींग व्याजदराचे पर्याय उपलब्ध
*अटी लागू
सारस्वत बँक
दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्यल्ड बँक)
पुणे झोन - ८/३, एरंडवणा, कर्वे रोड, नळ स्टॉप जवळ, पुणे ४११ ००४.
Website: www.saraswatbank.com
e-mail: customerservicecentre@saraswatbank.com

साधना साप्ताहिक :
४ जुलै २०१५

Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ / रजि.क्र. पी.सी.डब्ल्यू./०८०/२०१५-१७
Posted at Marketyard PSO, Pune / Posting Every Thursdy/Date of Publication : 25-6-2015

दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली

मुखपृष्ठ व मांडणी बदललेली आहे.




# सम्यक सकारात्मक

साधना साप्ताहिकातील निवडक संपादकीय लेख

विनोद शिरसाठ

पाने २५६ । किंमत : २०० रुपये

आज सभोवतालच्या लोकांकडून सर्वांत मोठी उणीव व्यक्त केली जाते ती माध्यमांकडील वैचारिक भूमिकेची. त्याबाबत मात्र 'साधना'ची स्थिती फारच समाधानकारक आहे. भारतीय राज्यघटनेला सुसंगत भूमिका आम्ही घेत आलो आहोत. काही विषयांवरील वैचारिक भूमिकांत अधिक स्पष्टता येत गेली, त्या भूमिका अधिक विकसित होत गेल्या; पण भूमिकेत बदल करावा लागला, अशी स्थिती गेल्या पाचही वर्षांत कधी आल्याचे दिसणार नाही. याचे कारण आपल्या आकलनाच्या अलीकडेच दोन पावले थांबायचे, या आमच्या सावधपणात दडलेले असावे.

मनोगत । विजय तेंडुलकर यांना अनावृत पत्र । डॉक्टर, हत्तीचे बळ आणायचे कुठून?

**विभाग १ : राजकीय** डाव्यांनी त्यांचे डावेपण सोडावे काय? । ती माकपची ऐतिहासिक चूक आहे काय? । ममतांचा विजय की डाव्यांचा पराभव? । नक्षलवादाला सहानुभूती हा भाबडेपणाच ठरेल! । मोदींच्या कर्तबगारीकडे कसे पाहावे? । भाजपला नेतृत्व मिळाले, दिशा मिळेल? । गडकरींना ग्रॅमी स्मिथ होता आले असते... । लढाई अटीतटीची करायची असेल तर...।

**विभाग २ : अ-राजकीय** मुख्य प्रवाह समजून घेण्यासाठी । त्यांच्या नजरेतूनही भारताकडे पाहायला हवे । पेल्यातील वादळ की वणवा? रामदेवबाबांचा हठयोग । अण्णांचे आंदोलन : अष्टदर्शने । मान-सन्मान आणि बलिदान । आदिवासी कार्डावर रबरस्टँप ज्याच्या हाती ससा तो पारधी

**विभाग ३ : सामाजिक** असे औचित्यभंग स्वागतार्ह आहेत! । डार्विनचा वारसा, तुकोबांचा आरसा । जैतापूर, लवासा आणि पैलतीर । विदर्भाला सुखी करा नि मुंबईचे वैभव कायम ठेवा! । गणित विषयाची हेळसांड थांबवावी! । समर्थनीय नाही, पण अपरिहार्य! । स्टील फ्रेममधील क्रीम क्लास । सर्वोच्च न्यायालयाचे दोन (अलक्षित) निकाल

**विभाग ४ : सांस्कृतिक** रानड्यांचे आवाहन, टिळकांचा इशारा! । पुस्तक परीक्षणांचा ऱ्हास का झाला? । अरुण साधूंनी ऐतिहासिक संधी गमावली! । आनंद यादव यांची माघार ही ऐतिहासिक चूक! । छोट्या वर्गावर मोठी जबाबदारी! कृपया, गैरसमज करून घेऊ नका! । खुदा के लिये । आमिर आणि वेन्सडे

**विभाग ५ : संकीर्ण** टिकेकर-केतकर पर्व । इम्रान आणि पवार । सचिनला राज्यसभा : राजकीय खेळी? । नोबल अल गोर, हम्बल देवेगौडा । नोबेल समितीचा धूर्त डाव । नोबेल समितीचा निर्दयी घाव । आर्थिक सुधारणा व कल्याणकारी योजना एका मर्यादेनंतर अभ्यासापेक्षा दृष्टिकोन महत्त्वाचा ठरतो!

**विभाग ६ : परिशिष्टे** आव्हाने कठीण का भासतात? । चौथा स्तंभ तिसऱ्या अवस्थेत । 'पुनर्भेट' अंकावरील चर्चेला उत्तर साधनाचा बालकुमार पाच वर्षांचा झाला! । साठीनंतरची पाच वर्षे

संपर्क : साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ३० फोन ०२० २४४५९६३५ mediasadhana@gmail.com